
# कृषितीर्थ

डिसेंबर २०२४ • वर्ष ६ • अंक १२ • जळगाव • पृष्ठे ५६ • मूल्य १०




## शेतकऱ्यांचा चैतन्य सूर्य

## भवरलाल जैन



## भाऊंच्या आयुष्याची जीवनमूल्ये
# हेच खरे गमक.... सार्थक आयुष्याचे !

सर्वोत्तम गुणवत्तेसह कामाचे ठेवावे भान,
मोल जाणून परस्परांचे मन राखावे छान ।।१
पैसा कमवावा पण मैत्री जपावी हाच सदाचार,
जिद्दीने ध्येयमार्गी चालतो, तोच खरा कर्तबगार ।।२।।
प्रश्न नाना पड़ती, ज्ञान-विज्ञान जिज्ञासा अंतरी,
'विश्वाचे व्हावे कल्याण', हाच ध्यास मनी धरी ।।३।।
स्वप्ने मोजकीच बरी, कामात रमावे सदोदित,
भोवताली सवंगडी माझे, जाणून घ्यावी जीवनरीत ।।४।।
उदात्त-अभिजात मूल्यांचा सदैव जीवनाधार,
गीत गतीचे गाताना, सर्वांगीण विकासाचा संस्कार ।।५।।
आव्हानांशी झुंजता झुंजता करू प्रखर धाडस,
शौर्य दोन्ही करात, दाटतो हृदयी हर्षोल्लास ।।६।।
यश-अपयश संघर्षाने अडखळली जरी वाट,
हृदयी सदैव उमलू द्या मानवतेची पहाट ।।७।।
नीती जलासारखी निर्मळ नितळ, वृत्ती असे खेळकर,
संकटे सहज करूनी पार, मनी प्रकाशला दीप-विचार ।।८
विश्वाचा करता विचार, बिंदुमात्र असलो जरी,
कामात प्रेम-सद्भाव अर्पिणे, हीच कमाई खरी ।।९।।
अखंड वादळे असो आयुष्यात, होऊ द्या संकटांची बरसात,
चालताना पडलो तरी पुन्हा पेटवू विझलेली ज्योत ।।१०।।
सुखादुःखाचे होऊनी साथी, हातात हात गुंफुनि काम करीत जाऊ,
'सार्थक करू या जन्माचे रूप पालटू वसुंधरेचे।' हीच प्रतिज्ञा घेऊ ।।११।।
सेवा आणते जगण्या सुगंध, प्रयत्नांती तणावही होतो संथ,
करितो विश्वकल्याण, तोचि खरा थोर गुणी-भाग्यवंत ।।।१२।।

(मूळ बर्टन ब्रेली यांच्या कवितेचा मुक्त भावानुवाद ज्ञानेश्वर शेंडे)



**भवरलाल जैन**
संस्थापक अध्यक्ष -
जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.

**जन्म :** १२ डिसेंबर १९३७
**निर्वाण :** २५ फेब्रुवारी २०१६

**http://www.bhavarlaljain.in/**

कृषितीर्थ


**संपादक**

डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे;
वर्ष: ६; अंक: १२ (५१) (डिसेंबर २०२४/
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.)

**मुद्रक, प्रकाशक**

मनिष अमृतलाल शहा यांनी जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. जळगाव यांच्यावतीने आनंद पब्लिकेशन, १०६/१/ए, एन. एच. क्र.५३, मुसळी फाटा, ता. धरणगाव, जि. जळगाव (महाराष्ट्र) येथून छापून जैन प्लास्टिक पार्क, पोस्ट बॉक्स नं.७२, बांभोरी, जळगाव-४२५००१ येथून अंक प्रकाशित केला आहे.



**पत्ता :** जैन प्लास्टिक पार्क, रा.म.क्र. ५३, पो.बॉ. ७२, जळगाव-४२५००१ (महा.) दूरध्वनी: ०२५७-२२५८०११;
ई-मेल: krushitirth@jains.com;
**संकेतस्थळ: www.jains.com**



**वर्गणी**

वार्षिक वर्गणी १०० रूपये. वर्गणीचा धनादेश 'कृषीतीर्थ जैन इरिगेशन' सिस्टीम्स लि, या नावाने काढावा.

आपण वर्गणी ऑनलाईन पद्धतीने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या खात्यावर जमा करू शकता.

बँक अकाऊंट - ३७६८८८३२७३८

IFSC Code - SBIN000७५७०

ब्रँच पत्ता - ९३, पोलन पेठ, दाणा बाजार, जळगांव. ४२५००१


# अनुक्रमणिका


**०४ अध्यक्षीय - अशोक जैन - भवरलाल भाऊ शेतकऱ्यांसाठी चैतन्य सूर्य!**



जैन इरिगेशन कंपनी व तिचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी जे काम आयुष्यभर केले त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात चैतन्य निर्माण होऊन भवरलाल भाऊ 'चैतन्य सूर्य' असल्याची जी भावना शेतकऱ्यांमध्ये उदयास येऊन वाढीला लागली त्या संदर्भातील हे विवेचन.

**०८ संपादकीय - डॉ. सुधीर भोंगळे - डॉ. भवरलाल जैन चैतन्याचा खळाळता स्वच्छंदी झरा!**

चैतन्य अंगी संचारल्याशिवाय कोणतेही नवीन काम उभे रहात नाही. भवरलाल जैन यांनी तर उण्यापुऱ्या ७९ वर्षांच्या आयुष्यात स्वकर्तृत्वाने व प्रखर ध्येयनिष्ठेने स्वत:चे नवे विश्व निर्माण केले. त्या विश्वनिर्मितीसाठी भाऊंच्या ठायी चैतन्याचा सागर कसा व किती उचंबळला असेल याचा धांडोळा घेणारे हे संपादकीय.



**२४ लेख - प्रभाकर खोले - खानदेशाचा डंका वाजविणारा मरूभूमीचा महाराष्ट्रपुत्र**




राजस्थानमधील मरूभूमीतून भवरलालजींचे पूर्वज १२७ वर्षांपूर्वी खानदेशात आले. अपार कष्ट व मेहनत करून त्यांनी सुखी कुटूंब उभे केले आणि या कुटूंबाचा नावलौकिक भवरलालजींनी जगभर आपल्या सोनेरी कर्तृत्वाने पसरविला. त्याची ही कहाणी.

**३२ लेख - सौ. अस्मिता खोले - भवरलालजी सुसंस्कृत क्रियावंताचा विचार बोध!**

ज्ञानी व अभ्यासू तत्वचिंतक आणि थोर विचारवंत म्हणून भवरलाल जैन यांच्याकडे आज पाहिले जाते. त्यांची ही जी प्रतिमा निर्माण झाली आहे ती लेखन, भाषण, आचरण यांमधून. या सर्व गोष्टींचा घेतलेला हा धावता आढावा.




**३८ लेख - डी.के. महाजन - केळी उत्पादकांची समृद्धी ही भवरलाल भाऊंची देणगी!**



पाईप व ठिबक सिंचन साहित्य आणि टिश्यूकल्चर केळी रोपांची निर्मिती भवरलाल भाऊंनी केल्यामुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या जीवनात जो आमूलाग्र बदल होऊन जे ऐश्वर्य व सुख-संपन्नता निर्माण झाली त्यासंबंधीची ही गोष्ट.

**४४ लेख - अरूण आजगांवकर - इवलेसे रोप लावियेले द्वारी त्याचा वेलू गेला गगनावरी!**

मागील ६१ वर्षात जैन इरिगेशन कंपनीने भारतातील शेतकऱ्यांच्या जीवनात जे सुखदायक परिवर्तन घडवून आणले त्यामागील विचारधारा, कार्यपद्धती आणि वाटचालीतून निर्माण झालेले आजचे स्थान यासंबंधीची केलेली मांडणी.



**५१ लेख - वसंतराव महाजन - भवरलाल भाऊंची नाळ शेतकऱ्यांशीच जुळलेली!**



खानदेशातल्या केळी पिकाची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहत असताना त्यात भवरलाल जैन यांनी जैन इरिगेशन कंपनीच्या माध्यमातून संशोधन व तंत्रज्ञानाची जी अमूल्य भर घातली त्यामुळेच जगाच्या बाजारपेठेत खानदेशी केळी पोहचू शकली याची उकल करणारी ही मुलाखत.



**ता.क. - शेतीच्या क्षेत्रात शेतकऱ्यांनी कायम राहून त्यांची आर्थिक उन्नती व्हावी व ती शाश्वत राहावी यासाठी ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाचा वापर व प्रसार होत राहणे आवश्यक आहे. हा जैन इरिगेशन कंपनीचे संस्थापक अध्यक्ष असलेल्या भवरलालजी जैन यांचा विचार होता. या विचारांना व ध्येयांना पुढे नेण्याच्या उद्देशाने कंपनी हे मासिक चालवित असून मासिकातील ज्ञान व माहिती सर्व शेतकऱ्यांनी अंगिकारावी व जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत ती पोहचावी हा आमचा हेतू आहे. तथापि ज्यांना या मासिकातील मजकूर पुर्नमुद्रीत करून वापरायचे असल्यास त्यांनी कंपनीची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.**



# मोठे भाऊ शेतकऱ्यांसाठी चैतन्य सूर्य !

जैन इरिगेशन कंपनीचे संस्थापक अध्यक्ष आणि आमचे परमपूज्य पिताजी भवरलालजी जैन उर्फ मोठे भाऊ यांची १२ डिसेंबरला जयंती आहे. म्हणजे एका अर्थाने १२ डिसेंबर रोजी त्यांचा ८७ वा वाढदिवस आहे. मोठे भाऊ थोर तत्वचिंतक व ख्यातनाम उद्योजक तर होतेच पण मुख्य म्हणजे शेतकऱ्यांच्या उन्नती, प्रगती व कल्याणाकरिता अहोरात्र धडपडणारे एक निस्वार्थी व ध्येयवादी शेतकरी होते. आयुष्यभर त्यांनी शेती व शेतकऱ्यांच्या उद्धाराचीच चिंता वाहिली व त्यांच्यासाठीच आपला देह चंदनाप्रमाणे झिजवला. म्हणूनच त्यांचा वाढदिवस हा समाजप्रेरक आहे. त्यांच्या कार्यापासून आपण सतत शिकतो. विचारातून नवनवीन बोध घेतो. लेखनातून प्रेरणा घेतो. त्यांच्या वाढदिवशी नवे उपक्रम हाती घेतो. नवे प्रकल्प राबवितो. कर्तृत्वाच्या समाधानाचे दवं म्हणजे वाढदिवस. आयुष्याचा देठ सांभाळणाऱ्या मोरपिशी स्वप्नांचा शामियाना म्हणजे वाढदिवस. अंतर्मुख



**अशोक जैन**
अध्यक्ष, जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.

**अध्यक्षीय**

होऊन विचार करायला लावणारा हा दिवस आहे. आपल्या कंपनीतील सर्व सहकाऱ्यांसाठी आणि परिवारातील सर्व लोकांकरिता हा चैतन्यदायी दिवस आहे. मुख्य म्हणजे आपल्या जन्मभराच्या कार्यातून शेतकऱ्यांच्या जीवनात मोठ्या भाऊंनी जो चैतन्याचा नंदादीप पेटविला त्याचे आवर्जून कृतार्थ भावनेने स्मरण करावे असा हा दिवस आहे.

शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञान व ज्ञान विज्ञानाने भारलेली 'हायटेक' शेती उभी करण्यासाठी मोठ्या भाऊंनी जी प्रचंड मेहनत घेऊन अविरत कष्ट केले आहेत त्याबद्दल कितीही लिहिले तरी कमी पडेल. शेतकऱ्यांच्या विकासासंबंधीची त्यांची जाणीव अमर्याद होती. ते काळाच्या पुढे पाहणारे व चालणारे द्रष्टे असल्यामुळे सद्यस्थितीत व सद्यकाळात काय करायला पाहिजे हे स्पष्टपणाने व बरोबर ते सांगत.

त्यांचा प्रवास मूल्यात्मक होता. त्यात मूल्यांचा सूक्ष्म अहंकार यत्किंचितही नव्हता. त्यामुळे जगण्याविषयीचे कुतुहल नि सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचा त्यांचा स्वभाव सर्वांना कायमचे आपलेसे करून गेला. परिणामी त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येक माणसाला 'मी भाऊंच्या खूप जवळ आहे', 'मी भाऊंचा अत्यंत लाडका आहे' असेच वाटायचे. प्रत्येक माणसातले चांगले गुण शोधून त्यांना 'माणसातले देवत्व' देण्याचा प्रयत्न त्यांनी अहोरात्र केला. संत तुकारामांच्या भाषेत सांगायचे झाल्यास त्यांचे वागणे- "दया तिचे नाव । भूतांचे पालन । आणिक निर्दाळण । कंटकांचे॥" अशा प्रकारचे होते. सर्व प्राणिमात्रांना आपले स मजून वागवणे म्हणजे दया. दया म्हणजे भीक नाही. आपल्यासारखाच त्याचाही मुक्त श्वास घेण्याचा हक्क मान्य करणे म्हणजे दया. हे फार अवघड आहे. घरातली चार माणसे सांभाळता येत नाहीत तर विश्वातले भूतमात्र सांभाळायचे हे येरागबाळ्याचे काम नाही. त्यासाठी मोठी मानसिक ताकद लागते. ती भाऊंच्या ठायी ठाम वसलेली होती. म्हणूनच कोणाही जीवाचा ते मत्सर करीत नव्हते. मात्र सज्जन शक्तिचे महत्त्व त्यांनी अचूक ओळखलेले असल्यामुळे तिचे त्यांनी कायम समर्थन केले व पाठिंबाही दिला. स्वत्वाचे समर्थ भान समोरच्या माणसाला करून देत होते. त्यातून माणसांचा आत्मविकास होत असे. माणसे जोडली जात. यातून सत्संग घडे. यातूनच जे नवे आत्मिक भान येत असे व सुसंवादाचे मळे फुलत त्यामधून कार्य प्रेरणेला नवनवीन धुमारे फुटत. चैतन्याला बहार येई आणि सर्व सहकाऱ्यांनी मिळून कामाचा गोवर्धन पर्वत कसा व कधी यशस्वीपणे उचलला हे समजतही नसे. काम फत्ते झाल्यानंतरच प्रत्येकाला भाऊंनी आपल्या अंतःकरणात चैतन्याची जी मिणमिणती पणती पेटविली तिची जाणीव होत असे आणि भाऊंच्या रूपाने चैतन्य सूर्य सतत आपल्या बरोबर होता त्यामुळेच हे काम पूर्णत्वाला जाऊ शकले अशी कृतार्थतेची भावना प्रकटे. याचा अनुभव माझ्यासह आपल्यापैकी अनेकांनी घेतलेला आहे. त्याबद्दल काहींनी बोलून दाखविले आहे तर काहींनी त्याबाबत लिहूनही ठेवलेले आहे.


*नांगर हाती धरणारे भाऊ स्वत: हाडाचे मोठे शेतकरीच होते*

अविरत कामात असलेले आणि ध्येयवादाने भारलेले भाऊ हा चैतन्याचा महाऊर्जास्त्रोत होता. त्यामुळे कामाचे कोणतेही क्षेत्र त्यांना वर्ज्य नव्हते. सर्व क्षेत्रात त्यांची बुद्धी लिलया संचार करीत असे. त्यांच्या बुद्धीला अभ्यास, निरीक्षण, सचोटी आणि व्यावहारिकतेची जरतारी किनार होती. त्यामुळे शेती व शेतकऱ्यांसंबंधीचा विचार करताना या दोघांनाही उर्जितावस्था व प्रगतीचे टोक कसे प्राप्त होईल याच दिशेने त्यांनी पाऊले टाकली. एका अर्थाने आपल्या चैतन्याचा झोत सतत तेवता ठेवून त्यांनी शेतकऱ्यांचे चैतन्य जागृत केले आणि भारताची शेती नवीन प्रगत दिशेकडे नेऊन तिला आधुनिक 'हायटेक' स्वरूप प्राप्त करून दिले. मात्र हे करताना छोटा, अल्पभूधारक शेतकरी त्यांनी सतत डोळ्यांसमोर ठेवला. लहान शेतकरी स्वतःच्या पायावर मजबुतीने व स्वाभिमानाने उभा राहू शकला पाहिजे आणि कमीत कमी खर्चात अधिकाधिक उत्पादन मिळवून व नफा गाठीशी बांधून त्याचा संसार सुफल झाला पाहिजे ही त्यांची अंतरीची मनिषा त्यांनी सतत धडपडत ठेवली. यातूनच असंख्य गोष्टींचा शोध लागला आणि अनेक कामे एकाच वेळी हाती घेतली गेली. भाऊ कधी, केव्हा आणि कसे शास्त्रज्ञ झाले हे त्यांना व आम्हालाही कळले नाही. स्वत:ला प्रचंड कामात गुंतवून घेतलेले भाऊ कुटुंबासाठी मात्र आवर्जून वेळ देऊन परिवारातल्या प्रत्येक माणसाची बारकाईने काळजी घेत होते. 'काम हेच जीवन' आणि 'जीवन हेच काम' असे जीवनाचे पक्के सूत्र असलेले भाऊ समाजालाही तितकाच वेळ देत होते. त्यांनी कधीही कोणाला मला आता वेळ नाही असे म्हटले नाही. पहाटे उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत ते कामातच गढून गेलेले असत. शरीराला रात्री आराम दिला तरी डोके मात्र चोवीस तास चालू असायचे, इतके ते चैतन्याने भारलेले होते.

दुसऱ्याचे पाईप विकता विकता भाऊ स्वतः पाईपांचे निर्माते झाले. इतकेच नव्हे तर जगातले सर्व प्रकारचे व प्रचंड क्षमतेचे आणि मोठ्या आकाराचे पाईप बनविणारी कंपनी बनविली. शेतकऱ्यांच्या गरजा, अडी-अडचणी, समस्या लक्षात घेऊन उपलब्ध नैसर्गिक परिस्थितीशी सांगड घालण्याचा प्रयत्न करून कामाचा डोलारा त्यांनी उभा केला. ठिबक व तुषार सिंचनाचे तंत्रज्ञान भारतात प्रथम आणून त्यांनी सूक्ष्मसिंचनाच्या क्षेत्रात क्रांती केली. या थेंब थेंब पाण्यावर का कुठे पिके येतात असा सुरुवातीला शेतकऱ्यांचा सवाल होता. कुणाचाच या तंत्रज्ञानावर विश्वास नव्हता, भाऊनी घरोघरी जाऊन व पथदर्शी प्रकल्प स्वतःच्या आणि इतर शेतकऱ्यांच्या शेतावर उभे करून थेंब थेंब पाण्यावर २५ ते ३० किलोचा केळीचा घड कसा पडतो हे कृतीतून दाखविले. नुसते तंत्रज्ञान आयात करून भाऊ थांबले नाहीत. त्यांनी आपल्या हवामान व परिस्थितीला समर्पक व योग्य होईल अशा पद्धतीने सिंचन साहित्याची संशोधन करून निर्मिती



*टिश्यूकल्चर प्लॅन्ट फॅक्टरीमध्ये तयार झालेल्या डाळिंब रोपांची मोठे भाऊ पाहणी करताना शेजारी डॉ. अनिल पाटील*



*जैन हिल्सवरील गांधीतीर्थ*

सुरू केली. हजारो वस्तु व सर्व साहित्य एकाच ठिकाणी बनविणारी जैन इरिगेशन ही जगातली पहिली कंपनी आहे अशी प्रतिमा अथक मेहनतीतून त्यांनी उभी केली.

खानदेशातली केळी जगाच्या बाजारपेठेत गेली पाहिजेत हा त्यांचा ध्यास व स्वप्न होते. त्यासाठी निर्यातक्षम होईल अशी केळीची 'ग्रॅन्ड नैन' ही जात परदेशातून आणून टिश्यूकल्चर तंत्राद्वारे ती विकसीत केली. आज या जातीने केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी आणि चैतन्याची बाग फुलविली आहे. ही केळी कशी वाढवायची याचे शास्त्र विकसीत करून त्याचे मार्गदर्शन भाऊंनी कंपनीमार्फत शेतकऱ्यांना केले. केळी वाहतुक व निर्यातीसाठी इन्फ्रास्ट्रक्चर उभे केले. प्रक्रियेसाठी पांढऱ्या रंगाचा व्ही-१२ या जातीचा कांदा विकसीत करून त्याचे बियाणे तयार करून ते शेतकऱ्यांना पुरविले. इतकेच नव्हे तर हमीभाव देऊन कांदा कंपनीमार्फत खरेदी करण्याची करार पद्धती विकसीत केली. शेतकऱ्यांवर अगतिकपणे व कमी किमतीने, तोट्यात माल विकण्याची वेळ येऊ नये म्हणून केळी, कांदा डाळिंब, आवळा, फणस, सीताफळ, मोसंबी, संत्रे, भाजीपाला या पिकांवर प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी केली. मसाल्याच्या पदार्थांमध्येही करार शेतीचे मॉडेल विकसीत करून जगभर मसाले पाठविले. विदर्भातील मॅन्डरीन ऑरेंजवर प्रक्रिया होऊ शकत नाही म्हणून ब्राझीलमधून फळात भरपूर ज्यूस असलेल्या व्हॅलेन्शिया, नेव्हल, नटाल, वेस्टीन, पेरा, हॅम्लिन यांसारख्या स्वीट ऑरेंजेसच्या जाती आयात करून त्यांची टिश्यूकल्चर पद्धतीने रोपे वाढविली व ती शेतकऱ्यांना पुरविली.

सघन व अतिसघन पद्धतीने फळबागा उभ्या करण्याचे तंत्रज्ञान विकसीत करून भाऊंनी फळबागांच्या उभारणीत एक नवा पायंडा पाडला. या बागांसाठी तंत्रज्ञान विकसीत केले, पाणथळ, क्षारपड, चोपण व खराब झालेल्या जमिनींची सुधारणा करण्यासाठी नवा पाईप व तो वापरण्याचे तंत्र विकसीत केले. सौर कृषी पंप तयार करून सौर उर्जेवर चालणारी अनेक उपकरणे बनविली. प्रक्रिया कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या टाकाऊ पदार्थांपासून सेंद्रीय खत बनविले. शेतकऱ्यांसाठी रोज काही तरी नवीन निर्माण केले पाहिजे या ध्यासातून कांदा पेरणी यंत्रे, आंतरमशागतीची उपकरणे व शेतीसाठी लागणारी अवजारेही बनवून शेतीत यांत्रिकीकरण वाढविले. शेतीप्रमाणेच शिक्षण, आरोग्य, संशोधन या क्षेत्रातही त्यांनी आपल्या कामातून वेगळा ठसा उमटविला. महात्मा गांधी यांचे जगातले सर्वात सुंदर व भव्य स्मारक 'गांधीतीर्थ' या नावाने जळगावातल्या जैनहिल्सवर उभे करून अगोदरच जगाच्या नकाशावर नेलेल्या नावामध्ये त्यांनी आपल्या गांधीतीर्थमधून सोनेरी मोरपीस खोवले. 'अनुभूती' नावाची इंग्रजी माध्यमाची नवी शाळा सुरु करून शिक्षणाचे दालन गरजूंसाठी खुले केले व संस्कारक्षम मुलें तयार केली. कलावंत, पत्रकार, शास्त्रज्ञ, लेखक, कवी, नाट्यकर्मी अशा विविध क्षेत्रातील व्यक्तिंशी भाऊंची घनिष्ट मैत्री होती. या निर्व्याज व प्रेमळ मैत्रीतून त्यांनी सर्वांना आपलेसे केले. त्यामुळे प्रत्येकाला भाऊ आपलेच आहेत असे वाटत राहिले आणि आजही वाटते. हीच त्यांची आयुष्याची मोठी कमाई आहे. त्यांनी स्वतःच्या कर्तृत्वाने जो चैतन्याचा झोत सोडला त्यातून राष्ट्र उजळून निघाले आहे आणि त्या प्रकाशाच्या वाटा आज आपल्या सर्वांसाठी मार्गदर्शक बनल्या आहेत हे कृतज्ञतापूर्वक नमूद करून मोठया भाऊंच्या चैतन्याला नमन करतो.

# डॉ. भवरलाल जैन
## चैतन्याचा खळाळता स्वच्छंदी झरा!




**जैन इरिगेशन कंपनीचे संस्थापक अध्यक्ष व थोर विचारवंत डॉ. भवरलाल जैन यांची १२ डिसेंबरला जयंती आहे. सारे जण त्यांना 'मोठे भाऊ' याच नावाने संबोधित असत. हे मोठे भाऊ म्हणजे चैतन्याचा खळाळता स्वच्छ, शुभ्र झरा होता. म्हणून जयंतीच्या निमित्ताने “भाऊंच्या जीवनातील चैतन्य” हा विषय येथे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.**



**डॉ. सुधीर भोंगळे**
संपादक

## संपादकीय


चैतन्य' या शब्दाला विविध छटा आहेत. अंतिमत: याची रुजवण 'चेत' अथवा 'चेता' या दोन शब्दांमध्ये जाणवते. म्हणून अगोदर छटा समजून घेऊया. संस्कृतमध्ये 'चेता' म्हणजे 'बुद्धी'. मराठी शब्दकोशामध्ये 'चेता' या शब्दाला 'जागा', 'जागृत' 'सावध' असे अर्थ आहेत. 'चेता' या शब्दाशी अर्थाच्या अंगाने जवळ असणारा दुसरा मराठी शब्द म्हणजे 'चेत'. 'चेत' या शब्दाला दोन मुख्य छटा आहेत. त्या दोन्हींचा परस्परांशी निकटचा संबंध दिसतो. 'चेत' या शब्दाचे मूळ संस्कृतातील 'चेतस' या शब्दाशी नाते आहे. 'चेतस्' म्हणजे 'मन'. त्यावरून 'चेत' म्हणजे 'चित्त', 'मन', 'अंतःकरण' हे अर्थ निष्पन्न होतात.' चेत' या शब्दाचे 'जागा' अथवा ' जागृत' असे अन्य दोन अर्थ होत. 'चेत' या शब्दाचे दुसरे जवळचे रूप म्हणजे 'चेतन'. मूळ संस्कृतानुसार 'चेतन' म्हणजे देखील 'मन' व 'बुद्धी'. त्यावरून जागेपणा, जागृती, उद्बोध, सजीवपणा, जिवंतपणा, सजीव, जिवंत, सचेतन असे नानाविध अर्थ चेतन या शब्दाला शब्दकोशात आहेत.



चैतन्याचे प्रतिक

'चेतन' या शब्दाला विभक्ती प्रत्यय लागून शब्द होतो 'चेतना'.जीवनशक्ती, प्राणशक्ती, जीव, प्राण, आकलनशक्ती, ग्रहणशक्ती, बुद्धी, चित्त, मन, ज्ञानशक्ती अशा विविध अर्थछटा 'चेतना' या शब्दाला आहेत. अर्थाच्या दृष्टीने 'चेतन' या शब्दाच्या जवळ जाणारा आणखी एक शब्द म्हणजे चेतव. उत्साह, जिवंतपणा, प्राणशक्ती हे होत 'चेतव' या शब्दाचे अर्थ. या सगळ्या अर्थांतराचे पदर 'चैतन्य' या शब्दामध्ये एकवटलेले दिसतात. जीव, प्राण, प्रवर्तक शक्ती, ज्ञानकला, आत्मा, ग्रहणशक्ती, आकलनशक्ती, चित्त, मन, चालक, चालना देणारी देवता, शक्ती, तत्व, परमात्मा, ईश्वर, भूतमात्रांमध्ये व्यापून असणारे तत्व, जड पदार्थांना चेतना देणारे तत्व... असे विविध अर्थ चैतन्य या शब्दाला आहेत. या सगळ्यांवरून' चैतन्य' या शब्दाचा वापर अनंत बाबींमध्ये आपण वेगवेगळ्या संदर्भात वेगवेगळ्या अर्थाने व हेतूने करत असतो, हे सिद्ध होते.

मराठीतील चैतन्य या शब्दाला इंग्रजी भाषेत Awareness, consciousness, pure bliss, Happiness, Intelligence, conscious self, Energy, Enthusiasm, Positive Thoughts and energy... everything that's Positive and active असे निरनिराळे अर्थ आहेत. 'चेतना' या सामान्य नामापासून बनलेले 'चैतन्य' हे भाववाचक नाम मूळ संस्कृत भाषेतले आहे. चैतन्य या शब्दाने अनेक गोष्टी ध्वनित होतात, सुचविल्या जातात किंवा संदर्भानुसार प्रतीत,



जैन हिल्सच्या शिळेवर पहाटेच्या वेळी चालणारी मोठ्याभाऊंची ओमकार व प्राणायामाची साधना

प्रतिबिंबीत होतात. 'चेतना' ही एक शक्ती आहे... म्हणजे प्रेरणा, उर्जा, स्फुल्लिंग किंवा ताकद. चेतना म्हणजे energy किंवा Power. Energy ची व्याख्या' 'capacity to do work' म्हणजेच काम करण्याची क्षमता अशी आहे. म्हणजेच 'चेतना' ही कार्यक्षमता, कार्यप्रवणता दाखवते. तिचे प्रकटीकरण म्हणजे 'चैतन्य'. हा चैतन्याचा झरा भवरलालजी उर्फ मोठे भाऊ यांच्या जीवनात स्वच्छंदीपणाने अखंड खळाळता राहिला याचे बीज त्यांच्या रोजच्या ऊँकार, प्राणायाम व योगसाधनेत आपल्याला सापडू शकते.

ॐकाराने प्राणायामाची क्रिया हळूहळू वाढते. यातून कुंडलिनी जागृत होते. यासाठी प्राणायामाचा अभ्यास कसून करायला पाहिजे. तो मोठ्या भाऊंनी मनापासून करून अव्याहतपणे चालू ठेवला होता. पहाटेच्या झोंबऱ्या पण आल्हाददायक वाऱ्यात जैनहिल्सच्या भव्य शिळेवर पद्मासन घालून डोळे मिटून घेतल्यानंतर ऊँकारासह प्राणायामाची जी साधना व आराधना मोठे भाऊ सुरू करीत ती किमान तास-दोन तास चालत असे. त्यामुळे येणारे सात्विकतेचे व प्रसन्नतेचे तेज अखेरपर्यंत त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होते.

सुषुम्ना ही अभ्यासपूर्वक केलेल्या साधनेतूनच कळते, याची पूर्ण जाणीव मोठ्या भाऊंना होती. त्यामुळेच त्यांचा सुषुम्नेचा मार्ग चैतन्याकडे जात राहिला. तो मूलाधार ठरला. वरच्या कमलाला 'स्वाधिष्ठान' म्हणतात. त्यावरच्या तिसऱ्या कमलाला 'मणिपूर' म्हणतात. चौथ्याला 'अनाहत', पाचव्याला 'विशुद्ध', सहाव्याला 'आज्ञा', सातव्याला 'सहस्त्रार' अशी नावे आहेत. या सगळ्यात ओज नावाची शक्ती श्रेष्ठ आहे. ती मेंदूत असते. ज्याच्या मेंदूत ओज अधिक तितका तो बुद्धीमान. असे ओजसंपन्न पुरुष शक्तीमान असतात, पण ते संख्येने फारच थोडे असतात. त्यात भवरलालजींचा समावेश होता. म्हणूनच इतक्या अल्प आयुष्यात (७९ वर्षे) ते अनेक आयुष्यात होऊ न शकणारी कामे एका आयुष्यात

करू शकले. वास्तविक ओज ही शक्ती प्रत्येकात असते. फक्त ती आपल्यात आहे याची जाणीव असावी लागते. मानवी शरीरातल्या ज्या विविध क्रिया चालतात त्यात ओज असते. ही ओज विधायक, सकारात्मक व सर्जनशील निर्मितीच्या दिशेने गेली तर नवे विश्व निर्माण होते व तसे ते प्रयत्नाने उभे करता येते हा प्रसाद व धडा मोठ्या भाऊंच्या चैतन्यातून आपल्याला मिळतो.

आणखीन एका गोष्टीचा उल्लेख येथे करणे आवश्यक आहे की, ज्याचा बोध मोठ्या भाऊंच्या जीवनातून आपल्याला मिळतो, तो म्हणजे प्राणायामातून जगण्यातली सहजता येऊ शकते. ओढून ताणून जीवन जगावे लागत नाही. शरीर अगदी सरळ ठेवा. सवयीने श्वासोच्छवास करा. आपोआप ज्ञानतंतू मोकळे होत जातील. श्वासाला लय येईल. स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या श्वासोच्छवासात नैसर्गिक फरक असतो. मोजक्या प्रमाणात श्वास आत घेणे, तसाच तो बाहेर सोडणे ही प्रक्रिया नीट जमायला हवी. त्यामुळे शरीरात एक प्रकारची छंदोबद्धता किंवा लय निर्माण होईल. याचा काही दिवस अभ्यास केल्यानंतर मनातल्या-मनात ॐ चा उच्चार करीत राहावे. दुसरा एखादा पवित्र शब्द उच्चारला तरी चालेल. ॐकारात श्वासाला लय मिळते. शरीर लयबध्द होते. मनाला विश्रांती मिळते. एकामागून एक नवनवीन कामे समोर आली तरी ती पूर्णत्वाला कशी न्यायची याचा स्थितप्रज्ञतेमुळे मार्ग सुचतो. चेहऱ्यावरचा भाव बदलतो. चेहऱ्यावरील शुष्कता नाहीशी होते. मनातली शांती चेहऱ्यावर येते. आवाज सुरेख होतो. चेहरा सुंदर होतो. बोलण्याला विचारांचा संयमपणा आणि कृतीला गतीचा धारदारपणा येतो. हे मोठ्या भाऊंच्या जीवनकार्याकडे बघितले की ठामपणे आपल्याला उमजते.



जागृतीचे प्रतिक

'उमज' हा शब्द आपल्या वापरात कमी आहे. कारण समज असेल तरच उमज पडते. 'समज; यामध्ये सम आहे. हीच जगण्याची सम आहे. उमज ही जगण्याची नस आहे. आपण समज हा शब्द अनेक समजुतींमुळे फार गुळगुळीत केलायं. समज यायला जन्मजात समज लागते. या समजेला खोली आली की, उमज येते. उमज म्हणजे समजेच्या खोलीचे



ग्रंथालयात वाचनात मग्न असलेले मोठे भाऊ

# भाऊंच्या चैतन्याला नियम व न्यायाची झालर!

सद्सद्-विवेकबुद्धीच्या आधारे बऱ्याचदा चैतन्याची गती, वेग व दिशा ठरते असे काही नितीशास्त्रज्ञ सांगतात. मुळात सद्सद्-विवेकाच्या आधारावर विचाराची बैठक पक्की होते. त्यातून काम कोणते व कसे करायचे किंवा निर्णय तडीस नेण्यासाठी कोणती पद्धती अवलंबायची याचे सुत्र ठरते. सुत्राला जर विचारांचा ठामपणा लाभला नाही तर चैतन्याची गती मंदावून त्यात थोडा ढिसाळपणा वाढीला लागतो. कोणतेही काम हाती घेण्यापूर्वी मोठ्याभाऊंनी त्यावर सखोल चिंतन, अभ्यास, माहितगार व अभ्यासक तज्ज्ञ यांच्याशी चर्चा केलेली असे. त्यामुळे कामाचा निर्णय एकदा का पक्का झाला की, त्यांच्या चैतन्याला तुफान वादळी वाऱ्याचे स्वरूप प्राप्त होत असे. अर्थात चैतन्याने हे वादळी वेग धारण करण्यापूर्वी सद्सद्-विवेकबुद्धीच्या कासेवर निर्णय घेण्याची नैतिकता भाऊ घासून पाहत असत. बटलर या तज्ज्ञाच्या मते सद्सद्-विवेकबुद्धीचे स्वरूप हे द्विविध आहे. १) ज्ञानात्मक २) अधिकारात्मक. ज्ञानात्मक स्वरूपात चिंतनाचे तत्व अंतर्भूत असते आणि अशा चिंतनाचा विषय व्यक्तिच्या कृती, चारित्र्य व उद्देश यावर अवलंबून असतो. अधिकारात्मक स्वरूपामध्ये बुद्धीने दिलेला निर्णय अंतिम समजला जातो. त्याला आव्हान दिले जात नाही. सारांश, विचारवंतांच्या मते सद्सद्-विवेकबुद्धी ही एकाच वेळी नियम सांगणारी, आरोप करणारी, साक्ष देणारी व न्याय देणारीही असते. मोठ्या भाऊंच्या चैतन्याला नियम आणि न्याय या दोन्हींचीही झालर होती. त्यामुळेच त्यांच्या सद्सद्-विवेकबुद्धीची वीणही तितकीच घट्ट व पक्की होती.





सद्सद्-विवेक बुद्धीचे प्रतिक

अर्थगर्भ मौन. समज काहीशी प्रकट होते. उमज अप्रकटातून प्रकटते. वारा दिसत नाही; पण स्पर्शाने जाणवतो. तशी उमज दिसत नाही; पण व्यक्तित्वातून जाणवते. मोठ्या भाऊंच्या जीवनाकडे पाहिले की उमज त्यांच्या ठायी किती खच्चून भरलेली होती याचे दर्शन घडते. उमज आपसूक येते आणि परिस्थितीनेही येते. आपणच आपला मूल्यात्मक विचार करण्यासाठी उमज उपयोगी पडते. समजण्यात समज कमी पडू शकते. उमजेत समज परिपक्व होते. त्यामुळे काहीही उणे पडत नाही. आयुष्याची वळणे आपल्याला स्वच्छ अनुभवता येतात. यातून चैतन्याचा व विश्वशक्तीचा अनुभव घेता येतो. उमज येण्यासाठी ज्ञानसाधना तर लागतेच पण नुसती ज्ञानसाधना पुरेशी ठरत नाही तर त्यासाठी आधी स्वतःला आरपार वाचीत राहावे लागते. वाचनातून आकलन वाढवायचे. आकलनातून मननात उतरायचे. अभ्यासाचा चौफेर फुलोरा वाढवायचा. हळूहळू स्वतःशी बोलायला लागायचे नि सर्व प्रकारच्या अनुभवांना सामोरे जायचे. कितीही संकटे आली तरी डगमगायचे नाही. त्यांच्याशी समर्थपणे विचारपूर्वक मुकाबला करायचा. लीनपणे प्रत्येक अनुभवातून शिकायचे. यातून जी नवी जाणीव निर्माण होते, तिला उमज म्हणतात. चैतन्यातून प्रकट झालेली ही उमज कार्य संस्कृतीशी कशी सांगड घालते हे मोठ्या भाऊंनी आयुष्यभर जी अनेकविध कार्ये तडीस कशी नेली यावरून दृष्टोत्पत्तीस येते.

जळगावचे जैन हिल्स किंवा जैन इरिगेशनच काय मोठ्या भाऊंनी ज्या अनेकविध क्षेत्रात जीव ओतून काम केले तिथेतिथे ते चैतन्यरूपानं भरून राहिले आहेत. हे ओळखायला शुद्ध मन लागते. मनाला ध्यानाची सवय लागते. ध्यान अभ्यासातनं जन्माला येत. अभ्यासाचं महत्व खूप आहे. समर्थ रामदासांनी दासबोधात लिहून ठेवलयं, "अभ्यासोनी प्रकट व्हावे। नाहीतर झाकोनी असावें। प्रकट होऊनी नासावें । हे बरे नव्हें।।" अभ्यास हा जसा ग्रंथात असतो तसाच तो सृष्टीत असतो. सृष्टी वाचता येणं हा खरा अभ्यास आहे. सृष्टी वाचनातून येणारा अनुभव सद्गुरुमय असतो. तो जगण्याला अर्थ प्राप्त करून देतो. असं जगणं अर्थपूर्ण असतं.

पुस्तकासाठी गुरू लागतो. तर सृष्टीसाठी सद्गुरू लागतो. सृष्टीच्या वाचनानं अनुभवाची खोली मिळते. जगण्याला नेमकी दिशा सापडते. प्रपंचाची योग्य जाणीव जन्मते. वेळेला समर्थ मन लाभते. दु:खाला सोबत करता येते. सत्ता ही सत् असते. चित्त हे चैतन्य असते. आनंद हा शुद्ध असतो. ज्ञानरूप आत्मा नित्य आनंदात असतो. अज्ञान हे प्रमाणांनी सिद्ध करता येत नाही. ते कशाचेही कार्य नसते. कोणतेही कारण नसते. त्यामुळे 'मी अज्ञान आहे' असे सांगण्यास भिते. आत्मा हा ज्ञानमात्र आहे. ज्ञान हे ही चैतन्याचेच एक लक्षण व अंग आहे. चैतन्य म्हणजेच प्राणशक्ती, जीवनरस, आनंद, क्रियाशीलताही. चित्-चेतना-चैतन्य अशी त्याची संक्रमण अवस्था आहे. म्हणूनच जगातील जे प्रकाशित, प्राणदायी, उत्साहवर्धक आणि सकारात्मक ही चैतन्याची रूपे आहेत.

याउलट चैतन्याचा अभाव म्हणजे अंधःकार, निरुत्साह, प्राणशक्तीचा व उत्साहाचा अभाव, सर्वकाही नकारात्मक! जेंव्हा चैतन्य असते तेव्हा सर्व काही आनंदमय असते, मनात, घरात, सभोवताली अन् निसर्गातही! चैतन्यच फुलात दिसते, कोंबात अंकुरते, बीजात स्फुरते. पालवीमध्ये बहरते, लदबदलेल्या फळांमधून ओसंडून वाहते. जैनहिल्स वरील आंबा, मोसंबी, पपई, केळीची बाग पाहिली की या चैतन्याचा साक्षात्कार घडतो. चैतन्य आहे तरच जीवन आहे, आनंद आहे अन् प्राणशक्तीही आहे. पावसाने ओढ दिलेल्या रानावर मृगाचा पहिला शिडकावा झाला की एकदम प्रसन्नतेचा शिडकावा होऊन परिसरात चैतन्य संचारते, हा आपला नित्याचा अनुभव आहे. ज्याच्यामुळे प्राणशक्ती जागते, मन व बुद्धीला तेज लाभते, उपक्रमशीलतेला बहर येतो, जागृती संचारते, चलनवलन वेग घेते, प्रगती दृश्यमान होते, उमेदीने कार्यप्रवणता जागून जिवंत असण्याला अर्थ लाभतो त्या त्या ठिकाणी चैतन्यशक्तीची अनुभूती येत राहते हे मोठ्या भाऊंनी काम केलेल्या प्रत्येक ठिकाणी आपल्याला दिसून येईल.

नवोन्मेषी उत्क्रांतीचे प्रतिक



आयुष्यभर चैतन्य तत्वाची आराधना व जपणूक केल्यामुळेच मोठ्या भाऊंना उद्योग समुहातून नवनवीन कामे करून उदमागी व नवोन्मेषी उत्क्रांती (Emergent evolution) करता आली. सॅम्युअल अलेक्झांडर (१८५९-



जैन हिल्सवर शास्त्रशुद्ध पद्धतीने पाणलोट विकासाचा कार्यक्रम राबविल्यामुळे सर्व तळी व तलाव पाण्याने पूर्ण भरून गेले

१९३८) याने मांडलेल्या उत्क्रांतीविषयीचा हा सिद्धांत आहे. स्पेन्सरसारख्या तत्ववेत्यांकडून अलेक्झांडरने विकासवादाची कल्पना स्वीकारली. पण त्यातली यांत्रिक विकासाची कल्पना त्याने खोडून काढली. त्याच्या मते विश्व ही एक अशा प्रकारची विकास योजना आहे की, जी मध्ये गती व परिवर्तनशीलता विद्यमान अवस्थेत पुनर्रचना घडवून आणतात, नव्या घटना निर्माण करतात. विकासाची ही एकूण प्रक्रिया गती, गतीपासून जडद्रव्य, जड द्रव्यापासून प्राण, प्राणापासून मन, अशा तऱ्हेने एका अवस्थेतून दुसरी अवस्था या प्रमाणे होत राहते. अलेक्झांडर या उत्क्रांतीला Emergent evolution असे नाव देतो आणि चैतन्य हाच या उत्क्रांतीचा पाया आहे हे ठळकपणे अधोरेखीतही करतो. चैतन्याचेच आणखीन एक रूप सकारात्मक दृष्टी हे आहे. अलेक्झांडरच्या या विचारांशी मोठ्या भाऊंचे विचार किती जुळणारे आहेत हे पुढील परिच्छेदावरून आपल्या लक्षात येऊ शकेल.

जळगावच्या जैन हिल्सवर १६ डिसेंबर २००७ रोजी ज्येष्ठ नागरिक संघाचा स्नेहमेळावा झाला. त्या मेळाव्यात भाषण करताना भवरलाल जैन म्हणाले, "....जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक करून घेणे आवश्यक आहे. सकारात्मक दृष्टिकोन विकसीत करणे आणि निःस्वार्थ सेवेकडे वळणे या मुद्यांचा विचार महत्वाचा! ही निःस्वार्थ सेवा नेमकी कोणत्या प्रकारची आहे? आणि कशी? ते करते काय? त्यामुळेच आपला संबंध जुळतो. आपल्या आयुष्याशी किंवा दीर्घायुष्याशी, आपल्या आयुष्य वाढीशी किंवा आपल्याला मिळणाऱ्या आनंदाशी (संबंधित) असा हा विषय आहे, गहन आहे, आध्यात्मिकही आहे. ज्या ज्या माणसांनी अशी सेवा केली, त्या त्या माणसांना स्वतः च्या वयाचा विसर पडला. त्यांनी स्वतःला ह्या कामात जसजसे गुरफटून घेतले तसतसे ते तरुण होत गेले, हा माझा अनुभव आहे. .... जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले आणि स्वत: ला सेवेसाठी वाहून घेतले तर आव्हानात्मक जगण्यातील आनंदाचा झरा पाझरत

## भाऊंच्या चैतन्याने शेतकऱ्यांच्या जीवनात फुलली समृद्धीची पहाट

उत्पादन प्रक्रियेतील कल्पनेचे स्वरूप हे बहुतांश प्रमाणात उपयोगितेच्या तत्वावर अवलंबून असते. कला प्रक्रियेतील स्वरूप सामान्य मानसशास्त्रातील कल्पनेच्या वर्णनावरून आकलन करता येणे कठीण आहे. सौंदर्यशास्त्रात कल्पनेचा स्वतंत्रपणे विचार केला जातो तर पर्यावरण शास्त्रात निसर्ग व पंचमहाभुतांना केंद्रस्थानी मानून त्यांना धक्का न लागेल अशा पद्धतीने कल्पनेच्या भराऱ्या मारल्या जातात. या कल्पनेचा चैतन्याच्या चढ-उतारांचा जवळचा संबंध आहे. तसे पाहिले तर कल्पना ही विशिष्ट नियमानुवर्ती असते. निदान कलातत्वज्ञानात तरी तसे दिसते. भूत, भविष्य व वर्तमान यापैकी कोणत्याही कालात जे घडेल ते ही कल्पना वर्तमानात दर्शित करते असे तिचे दुसरे वैशिष्ट्य आहे. कल्पनेचा आणखी एक गुणविशेष म्हणजे तिची कार्यान्वयी प्रकृती नाट्यात्मक असल्याचे सांगण्यात येते.


समृद्धीचे प्रतिक

पण उद्योगधंद्यात एखादी कल्पना जेव्हा चैतन्याचे वादळी रूप धारण करते तेव्हा नुसत्या उत्पादित मालाने बाजारपेठ फुलून व भरून जात नाही तर क्रांतीचा वेश परिधान करून ती मानवी जीवनामध्ये नवी उत्क्रांती घडवून आणते. अशी उत्क्रांती भवरलाल जैन यांनी पीव्हीसी व एचडीपीई पाईप, ठिबक व तुषार सिंचनाचे तंत्रज्ञान आणि टिश्यूकल्चर तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेली केळी, डाळिंब, मोसंबी, संत्री, पपई व इतर पिकांची रोपे यात घडवून आणली. त्यामुळे त्यांचे चैतन्य शेतकऱ्यांच्या व राष्ट्राच्या उन्नतीला नवा श्वास देणारे ठरले. या चैतन्याने शेतकऱ्याला उत्तम दर्ज्याचा, गुणवत्तेचा व निर्यातक्षम माल तयार करण्यास सहाय्य करून त्याला जगाची बाजारपेठ दाखविली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या घरादारात सुखसमृद्धी नांदून डॉलर खिशात खुळखुळू लागला.




जैन हिल्सवर १६ डिसेंबर २००७ रोजी झालेल्या ज्येष्ठ नागरिक संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मोठेभाऊ बोलतांना

असतो, हेच मानवी जीवनाच्या पूर्ण यशाचे गमक आहे." (संदर्भ-जैन हिल्सवरील जागरण जुलै, २०१३: पान ८२-८३)

जीवनात यशस्वी होऊन "कठिण समस्येवर, निर्विकार व सोपा मार्ग शोधायचा असेल तर संतांच्या मधुरवाणीचे श्रवण करावे. अध्यात्म आणि वास्तव यांचा मिलाफ त्यात असतो", असे सांगणारे भवरलालजी आवर्जून एका गोष्टीचा उल्लेख करतात तो म्हणजे, "ईश्वर हा मोठा कलाकार आहे. देत असताना तो सगळ्याच गोष्टी एकाला देत नाही, सर्वांना वाटून देतो". इथे भाऊंच्या मनातील सर्वात्मक या संकल्पनेची उकल होण्यास मदत होते. सर्वात्मकता ठायी बसणे हेच मुळी चेतनेला प्रेरणा देऊन चैतन्य वाढीला लावणारे आहे. 'सर्वात्मक' हा शब्दच मुळी कुणाही भावज्ञाला अंतर्मुख करण्यास समर्थ आहे. वस्तुत: मोठ्या भाऊंच्या संवेदनक्षम मनाला सभोवतालच्या सृष्टीतून सर्वात्मक स्वरूपाचेच दर्शन घडत होते आणि तेच त्यांच्या ज्ञानेंद्रिये, मन व बुद्धी यांच्या माध्यमातून कळत वा नकळत सर्वात्मकभावच अंतरंगात प्रकाशत होता. सर्वात्मकभाव म्हणजेच सामरस्यभाव. भाऊंच्याकडे दुजाभाव नाहीच. प्रत्येकाला आपल्या लेकराप्रमाणे समजून त्याच्याशी संवाद पण तो ही प्रेमाने व हळूवारपणे साधण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. ही हातोटी हाच चैतन्याचा एक आविष्कार होता. यासंबंधीची हजारो उदाहरणे मोठ्या भाऊंच्या संपर्कात आलेली असंख्य माणसे सांगू शकतील. या उदाहरणांचे जर भविष्यात आपण संकलन करू शकलो तर पुढच्या अनेक पिढ्यांना चैतन्याचा झरा किती निर्मळ व स्वच्छंदी असू शकतो याचे दर्शन घडल्याशिवाय राहणार नाही.


समरसतेचे प्रतिक

वास्तविक सृष्टीच्या सर्व घटकांतही आपल्याप्रमाणेच चैतन्याचा आविष्कार आहे, याची मोठ्या भाऊंना पुरेपूर जाणीव असल्यामुळे ही सृष्टी आपल्याला जशी मिळाली आहे त्यापेक्षा अधिक सुंदर करून ती सोडावी हा ध्यास ऊराशी बाळगून ते अखेरपर्यंत कार्यरत राहिले. त्याच दिशेने काम करीत गेले. साहजिकच




पॉलिहाऊसमध्ये वाढविलेल्या रंगीत ढोबळी मिरचीची पाहणी करताना मोठे भाऊ, अजित जैन, एस.एन. पाटील व इतर सहकारी

सृष्टीशी आपले जिवाभावाचे नाते आहे. हे नाते उमजू लागले की, 'आत्मनस्तु कामाय सर्व प्रियं भवति' हे याज्ञवल्क्याचे प्रतीतीचे बोल अंर्तयामी भिडू लागतात. सर्वस्पर्शी प्रेमाचे परम विधान असणाऱ्या या आत्मतत्वाविषयी प्रत्येक विचारी व्यक्तीला स्वभावतःच जिज्ञासा असते. मोठे भाऊ तर जिज्ञासेचा महासागर होते. या जिज्ञासेतूनच जीवनविकास होतो अशी त्यांची धारणा होती. ही जिज्ञासा चैतन्याला सतत पुढे ढकलत राहते. सर्वात्मक स्वरूपाच्या आविष्कारातील सौंदर्याचा पंचज्ञानेंद्रियातून, शिवाचा मनातून आणि सत्याचा बुद्धीतून वेध घेण्याच्या प्रयत्नातूनच सर्व कलांचा व शास्त्रांचा उगम झालेला आहे. बुद्धीला ही सत्यान्वेषणाची प्रेरणा लाभण्यासाठीच 'धियो यो नः प्रचोदयात्; हे अर्थगर्भित शब्द अभावितपणे माणसाच्या तोंडून उमटतात. प्रशांत प्रसन्नतेचे लेणे लेऊन मानवी मन शिवाचे आविर्भवन अनुभवण्यासाठी सिद्ध होते. पंचज्ञानेंद्रिये सौन्दर्याच्या दिव्यानुभूतीसाठी आतुर होतात. आपापल्या स्थायिभावानुसार सृष्टीतून ओसंडणाऱ्या चैतन्यांचीच अनुभूती घेऊन ती सुखावतात. या अनुभूतीचे पडसाद मनात उमटतात, तरल संवेदनेची एखादी तार नकळत कंपन पावते आणि या सुसंवादातून मनाचे सृष्टीशी नाते जुळते. या समरसतेतूनच मानवाचे भावविश्व समृद्ध होते. किंबहुना, जीवन म्हणजेच सभोवतालचे सृष्टीशी साधलेली ही समरसता! संवेदनक्षम मनाची ही समरसताच सर्जनशीलतेचा मुलाधार आहे. या समरसतेतूनच उत्कृष्ट निर्मिती तर होईलच पण साहित्य, संगीत, कलांचे आकृतीबंधही अंतर्मनात साकार होऊ लागतील अशी गाढ श्रद्धा मोठ्या भाऊंच्या मनात होती. म्हणूनच 'अनंत रूपे अनंत वेषे' प्रकटणाऱ्या सर्वात्मकाशी समरसलेले भवरलालजींचे जीवन हा आनंदाचा व चैतन्याचा डोह होता. या 'आनंदाच्या डोही, आनंदाचेच तरंग' उमटले तर मग नवल वाटायला नको!



ज्ञानाचे प्रतिक



समतोलाचे प्रतिक

चैतन्याचा अतिशय जवळचा संबंध ज्ञान, बुद्धी व आत्मा यांच्याशी आहे. यांचा त्रिवेणी संगम झाल्यानंतरच चैतन्याला जे प्रचंड उधाण येते ते कार्यपूर्णत्वाकडे घेऊन जाते. अशी किती तरी नवनवीन कामे पूर्णत्वाला जाताना भाऊंच्या चैतन्याला जे अमाप उधाण आले असेल त्याचे मोजमाप आपण आज तरी अंदाजानेच करू शकतो. आणि त्यावेळी कर्मपूर्तीचा जो आनंद भाऊ व त्यांच्या सहकाऱ्यांना मिळाला असेल त्याचाही अंदाज लावू शकतो. कारण त्याचे मोजमाप व वर्णन शब्दात करता येत नाही. मात्र कर्मबंधनातून मुक्त होऊन आनंद अनुभवण्यासाठी यथार्थ ज्ञानाचीच आवश्यकता आहे. यथार्थ ज्ञानाने कोणताही मोह उरत नाही. 'यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि' (गी.४.३५) असे गीता निक्षून सांगते. ज्या योगे कर्मबंधनाच्या श्रृंखला-कर्तृत्वाचा मद व फलाची अभिलाषा-तुटतात, तेच उन्नतिकारक ज्ञान जे गीतेला अभिप्रेत आहे तेच मोठ्या भाऊंनाही अभिप्रेत होते. त्यामुळे कोणत्याही यशाने किंवा पुरस्काराने ते हुरळून गेले नाहीत. उलट त्यांनी, "पुरस्कार आणि सन्मान केवळ मैलाचे दगड आहेत. ते आपल्याला आपण आजपर्यंत जे काही केलं त्याहीपेक्षा अधिक उत्तम भविष्यात करण्याच्या आपल्या जबाबदारीची आठवण करून देत राहतात" असेच म्हटले. जीवन-विकास करणाऱ्या या ज्ञानासारखे दुसरे पवित्र काहीही नाही,

***न हि ज्ञानेनं सदृश्यं पवित्रमिह विद्यते।***


***तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनातत्मनि विन्दति।। (गी.४.३८)***

असे जे गीतेने सांगितले ते भाऊंनी आयुष्यभर प्रमाण मानून त्याच वाटेने मार्गक्रमणा केली. आपल्या स्वरूपाचे हे ज्ञान कुठून बाहेरून मिळवायचे नसून चित्त स्थिर करून व त्यात चैतन्य निर्माण करून निवांतपणे आपण आपल्याशीच त्यांनी अनुभवले असावे. हा अनुभव अहंकारमुक्त झाल्याशिवाय येत नाही. मुंगीपासून ब्रम्हदेवापर्यंत सगळ्यांमध्ये अहंकार आहे. त्यामुळे अनेकांना आनंदाचा अनुभवच येत नाही. यासाठी आधी चैतन्यतत्वाचा अनुभव यावयास हवा. कृती आणि शब्द एक हवेत. एका हातातली वस्तु दुसऱ्या हातात घेतली म्हणजे देण्या-घेण्याचा व्यवहार झाला असे होत नाही. काठावर समुद्राच्या लाटांवर लाटा येतात. आपण त्यांच्याशी खेळतो. त्यांना पकडण्याचा प्रयत्न करतो. पण लाट पकडता येत नाही. त्यासाठी सजग राहावे लागते. तसा हा खेळ आहे. जगाच्या काठावर आपण उभे आहोत. चैतन्याच्या लाटांवर लाटा येत आहेत. पण किती लोकांना लाटा पकडता येतात? सावध राहूनही लाट हातात येईल याचा भरवसा नाही. समजा, लाट पकडली, तरीही, लाट हातात येत नाही. येते ते चुळाभर पाणी. ओंजळ लहान असते. लाट मोठी असते. याचा मेळ कौशल्याने घातला तरच ते आकळते. हे कौशल्य भाऊंच्या ठायी वसलेले होते. त्यामुळे त्यांच्या जगाकडे बघण्याला चैतन्य आले.



*भारताच्या राष्ट्रपती महामहीम प्रतिभाताई पाटील यांच्या शुभहस्ते 'पद्मश्री' पुरस्कार स्विकारताना मोठे भाऊ*

# मोठे भाऊ : मूर्तिमंत बुद्धियोगी




ज्याच्या ज्याच्यामुळे प्राणशक्ती जागते, मन व बुद्धीला तेज लाभते, उपक्रमशीलतेला बहर येतो, जागृती संचारते, चलनवलन वेग होते, प्रगती दृश्यमान होते, उमेदीने कार्यप्रवणता जागून जिवंत असण्याला अर्थ लाभतो त्या त्या ठिकाणी चैतन्यशक्तीची अनुभूती येत राहते. याचा साक्षात्कार मोठ्या भाऊंच्या समवेत काम केलेल्या हजारो सहकाऱ्यांना वारंवार झालेला आहे. हाती घेतलेले काम तडीस कसे न्यायचे आणि त्यासाठी कोणती कार्यपद्धती अंमलात आणायची याचे अत्यंत सोप्या व सरळ शब्दात भाऊ जेव्हा मार्गदर्शन करीत तेव्हा त्यांच्या बुद्धीला जे विलक्षण तेज प्राप्त होऊन धुमारे फुटत असत ते पाहून अवाक् व्हायला होत असे. श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतेच्या दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगितली आहेत. ती बुद्धियोग आचरणात आणणाऱ्या मोठ्या भाऊंना तंतोतंत लागू पडतात. बुद्धियोगी हा नित्य तृप्त असतो. म्हणजे त्याचे मन समतोल असते. त्याच्या इच्छा अलौकिक असतात. त्याला पक्के ठाऊक असते की, आत्मा आनंदमय आहे. त्यामुळे तो आत्म्याच्या सुखासाठी धडपडतो. जीव विषयासक्त असल्याने तो दीन होतो. त्याचे विचार अलौकिक असतात. तो प्रपंचात राहून सारे करतो. परंतु तो अलिप्त मनाने वावरतो. मनातून मात्र तो आत्मसुखात रमतो. त्यामुळे संसाराताली दुःखे सहन करण्याचे सामर्थ्य त्याला लाभते. त्याच्या मनात उद्वेग उत्पन्न होत नाही. सांसारिक सुखात तो अडकत नाही. अंतःकरण स्वच्छ असल्याने तो अभ्यासात रमतो. चिंतनातून त्याच्या लक्षात येते की, हे संपूर्ण विश्व अद्वितीय आहे. त्यातले चैतन्य असाधारण आहे. हे खरे जग आहे हे तो स्वानुभवाने जाणतो. त्यामुळे तो निर्भय होतो. त्याला अद्वैताचा अनुभव येतो. पौर्णिमेचा चंद्र आपला प्रकाश सर्वांना सारखा प्रकाश देतो. तसा बुद्धियोगी सर्वांशी समान असतो. बुद्धियोग्याचे वरील वर्णन वाचल्यानंतर मोठेभाऊ अगदी तसेच होते याची आपल्या अंतःकरणाला खात्री पटेल आणि तशी खूणगाठही तुम्ही मनाशी निश्चित बांधाल.

चैतन्य शरीरात प्रकट झाले की, विश्वाला दृश्यपणाने पहाते. ते दृश्य विश्व नाहीसे झाले की, विश्वाच्या सर्व अभावासहित ब्रम्हचैतन्य पहाते. असे ब्रम्हरूप पाहणे म्हणजे, 'रूप पहाता लोचनी। सुख जाले हो साजणी।।' हा अनुभव आहे. ज्ञानदेवांप्रमाणेच मोठ्या भाऊंनाही जग हा चिद्विलास वाटत असे. त्यानिमित्ताने एक चैतन्य स्वतःच्या ठिकाणी स्फुरते आणि ते त्याला पहाते आहे याची जाणीव भाऊंना होती. त्यामुळेच ते म्हणाले, "ईश्वराने मनुष्याला हृदय दिले आहे, ते इतरांच्या पीडा आणि दु:ख यांच्याशी समरस होण्यासाठी आणि तसे नसेल तर मनुष्यजन्म व्यर्थ आहे." एवढेच म्हणून

सहकार्याचे प्रतिक



चिरंजीव झालेले हे चैतन्यच आपल्याला काम आनंदाने व स्वखुशीने पूर्ण करण्याची प्रेरणा देते. हा अनुभव मोठ्या भाऊंचा ज्यांच्या ज्यांच्याशी संबंध आलेला असेल त्यांना नक्कीच आल्याशिवाय राहीलेला नसणार. इतके त्यांचे चैतन्य सामर्थ्यवान व प्रेरणादायी होते. त्यामुळेच थोर अणुशास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्सटाईन यांचा e=mc2 असा जो सिद्धांत आहे तो मोठ्या भाऊंनी स्वतःच्या अनुभवानुसार e (ई) म्हणजे एक्सलन्स (उत्कृष्टता), m (एम) म्हणजे मानव संधारण, पहिला c (सी) म्हणजे कॅरेक्टर (चारित्र्य) व दुसरा c (सी) म्हणजे कमिटमेंट (बांधिलकी, समर्पणभाव व अनुबंध)






ते थांबले नाही. भाऊंनी एके ठिकाणी पुढे असेही म्हटले, "ज्या माणसाला आपल्या स्वतःची मूल्ये, श्रद्धा गवसलेली नाही, तो माणूस म्हणजे समुद्रात चालणारे एक होकायंत्र नसलेले जहाज." ते कसेही, कुठेही भटकते. पण अंतःकरणात चैतन्य प्रज्वलित व प्रफुल्लित झालेले असेल तर ते कुठेही भटकू न देता ध्येयाच्याच दिशेने मार्गक्रमणा करायला भाग पाडते. हाच चैतन्याचा मोठा फायदा आहे. ते त्याच्या ठिकाणी स्वाभाविकच आहे. ते वेगळे करता येत नाही. हा जगदाभास चैतन्याने व्यापलेला आहे. चैतन्यच चैतन्याला आधार देते. या साऱ्यातून शेवटी चैतन्यच उरते. मोठ्या भाऊंची आठवण झाली की, त्यांच्या ठायी




उत्कृष्ठतेचे प्रतिक

असा अर्थ असल्याचे सांगितले. एवढ्यावरच न थांबता त्यांनी एके ठिकाणी पुढे असेही नमूद केले की, "आपली दूरदृष्टी आणि स्वप्नं एवढी शक्तीशाली असली पाहिजेत, की त्यांना पूर्ण करण्यासाठी तेच तुमच्यावर दबाव टाकून तुम्हाला प्रेरीत करते. मात्र त्यासाठी आपला निग्रह, निर्धार आणि समर्पण उच्च कोटीचे असावे." अशी प्रेरणा निर्माण करणारे चैतन्यही तितकेच जोरकस, प्रभावी आणि उसळ्या मारणारे असले पाहिजे. तरच उत्तिष्ठत! जागृत! प्राप्यवरान् निबोधयत! उठा! जागे व्हा! स्वतःला ओळखा! याचा अनुभव येऊ शकतो.

चैतन्य प्रत्यक्ष कृतीत उतरविण्यासाठी यथार्थ ज्ञानाचे भान अतिशय गरजेचे आहे. असे भान असणारा

विश्वावर राज्य करू शकतो. सक्रिय होण्याची दृष्टी वर्तमान देतो. हे अनुभवाने जाणलेल्या भाऊंनी म्हणूनच संवाद व चर्चेवर भर दिला. अगदी लहानातल्या लहान सहकाऱ्याचे बोलणेही त्यांनी लक्षपूर्वक ऐकून समजून घेतले. त्याच्याशी मनमोकळा संवाद करून त्याला बोलते केले. त्याच्या विचारांना वाट करून दिली. विचार हा कधीही एकाक्ष नसतो. तो अनेक विचारांनी मिळून येतो व परिपूर्ण होण्याच्या दिशेने जातो. म्हणून संवाद महत्वाचा आहे. संवादातून आपण आपल्याला उकलत जातो. आपले उकलणे हे एका अर्थाने उमलणे असते. बोलण्यातून अधिक उमलतो. त्याला ज्ञानदेवांनी 'संतांची संगत' तर स्वामी विवेकानंदांनी 'गुरूशिष्यांचा बोधभावी संवाद' असे म्हटले आहे. संवादातून आपण कुठवर चालू शकतो ते आपल्याला समजते. मोठ्या भाऊंच्या संगतीने सहकाऱ्यांना चालायला धीर मिळत असे. त्यांच्या छायेखाली वाटचाल करताना अनेक प्रश्नांची उत्तरेही मिळत असत. असा अनुभव माझ्यासह अनेकांनी घेतलेला आहे. यातून त्यांच्या द्रष्टेपणाचे दर्शन घडते. द्रष्टा घडतो.




कल्पनाशक्तिचे प्रतिक

ज्ञानावर होणारा हा अत्यंत महत्वाचा संस्कार भाऊंच्या सहवासातून आम्हाला लाभलेला आहे. त्यातून दृश्य व द्रष्टा यांच्या ऐक्याचे स्वरूप किती विलक्षण असते हे ही अनुभवता आले आहे. एकूणच नामरूपात्मक जगात चैतन्याच्या भेदशून्य स्थितीला काहीही उणेपणा नाही हेच खरे!यालाच संत ज्ञानदेवांनी 'अनुपम्यचिद्विलास' असे म्हटले आहे. ज्या ज्ञानाच्या युगाने सर्व जग प्रकाशले आहे ते ज्ञान आम्हाला हवे आहे. अशी जी आशा आज आपण धरतो त्यासाठीची आराधना मोठ्या भाऊंनी देखील आयुष्यभर केली होती हे आपल्याला कधीही विसरता येणार नाही. ज्ञान व अभ्यासाशिवाय चैतन्य निर्माणच होऊ शकत नाही.

त्या ज्ञानाची नावे विविध असतील. सोन्याच्या देवाच्या मूर्तीला 'श्री गजानन' म्हणावे. डोळ्यात अंजन घातले की त्या दृष्टीला 'काजळ' म्हणावे. ही विविध नावे आहेत. म्हणून प्रकाशमान जगत आणि प्रकाशमान चैतन्य हे एक आहे. सूर्य जरी मावळून काळोखात गेला तरी त्याच्यापुढे काळोख येत नाही. त्याप्रमाणे विचारांनी आत्मवी अज्ञान पहावयास गेले


वाकोद गावातील शेतकऱ्यांशी संवाद साधताना मोठे भाऊ



# जीवनातील चैतन्याने देह सुफळ होऊन सार्थकी लागला

भवरलाल भाऊ आयुष्यभर जळगांवमध्ये राहिले. इथे राहूनच त्यांनी जगभरातल्या स्वत:च्या कंपन्या चालविल्या. गिरणा नदीच्या काठी वसलेल्या जळगावातील जैन हिल्स आणि प्लास्टीक पार्क या दोन ठिकाणी बसून त्यांनी आपली कर्माची गिरणा सतत दुथडी भरून वाहती ठेवली. त्यांच्या या गिरणेला प्रवृत्ती आणि निवृत्ती असे दोन काठ होते. प्रवृतीच्या काठावर त्यांच्या चैतन्याला इतके उधाण आले की, निराशेने, औदासिन्याने, खेदाने, हतबलतेने, अडीअडचणी व संकटांनी व्यापलेल्या वातावरणात अचानक एखादी सुवार्ता येण्याने तिथले थिजलेपण क्षणार्धात विरून जाऊन तिथे चैतन्य सळूसळू लागावे अशी स्थिति आंब्यातले टिश्यूकल्चर यशस्वी झाल्यामुळे प्राप्त झाली. प्रक्रिया केलेला कांदा हा जगाच्या बाजारपेठेत गेला. बघता बघता १३२ देशांची बाजारपेठ जैनच्या मालाने व्यापली. पलीकडच्या निवृत्तीच्या काठावर त्यांचे लेखन, वाचन, संभाषण, संवाद बहराला आला. जैनहिल्सवरच्या वृक्षवल्लींनी भाऊंना आकाशाएवढे होण्याचा मार्ग दाखविला. मित्र, सगेसोयरे, आप्तेष्ट, जगभरची माणसे तीर्थावर गोळा झाली. समाजाला सन्मार्गाच्या वाटा येथूनच मोकळ्या झाल्या. आकाशही भाऊंसाठी जैनहिल्सवरचं मुक्कामाला आले. सगळे पशू-पक्षी, प्राणी, दगडगोटे, झाडे, पाने, फुले, फळे, झरे त्यांचे मित्र झाले. रोजच्या पहाटेच्या संवादाने त्यांना लळा लावला. 'शब्देविन संवादिजे' हा भाव उत्पन्न झाला. भाऊंनी निसर्गाला आणि निसर्गाने भाऊंच्या जीवनाला समजून घेतले. ते दोघेही सुखदु:खाच्या मुळापर्यंत गेले. जगता जगता जगण्याचा अभ्यास केला. 'मी' चा समग्र अभ्यास करून त्याला सु-वळण लावले. त्यामुळे त्यांच्या जीवनात लोकांना जगण्याचा भावार्थ सापडला. “जीवनाचा बारकाईने विचार करून तो जे सत्कारणी लावतो ते जीवन” अशी संत तुकारामांनी जीवनाची व्याख्या केली आहे. जसे बोलावे तसे चालल्याने भाऊंचे कर्मही सुफळ झाले आणि जीवनात अखेरपर्यंत चैतन्य राहीले. त्यामुळे देह सार्थकी लागला.

तर अज्ञान व सापेक्ष ज्ञान या कल्पना नाहीशा होऊन केवळ आत्मतत्व पुरून उरते.याला तुम्ही कोणत्याही देवाचे नाव द्या. ते तेच असते. त्याला 'नित्यज्ञानरूपस्वात्मभाव' म्हणतात. हे मोठ्या भाऊंच्या सहवासाने अनेकांना लाभले. त्यामुळे कित्येकांनी त्यांना गुरू, सद्गुरूचे स्थान दिले. गुरूत्व हे विश्वात चिरंतन असते. उपदेश करणारे वाट्टेल तेवढे मिळतात. त्याप्रमाणे आचरण करणारा मोठ्या भाऊंसारखा एखादाच असतो. त्यातून ज्ञान-अज्ञान वृत्तिशून्य नित्यज्ञानरूप आत्मभाव कसा आहे याचा अनुभव येतो. तो स्वभावरूप वाढत जाऊन तिन्ही लोकांत मावेनासा होतो. आत्मरूप विश्वरूप होतो. यामध्ये लपता येणे आणि प्रकट होणे हे दोन्ही होत नाही. आत्मानुभव पूर्ण होतो. पूर्णत्वातून पूर्ण उरते. ते शब्दात सांगता येत नाही. त्याची अनुभूती फक्त अनुभवायची असते. भाऊंच्या सहवासातून याचा प्रत्यय आला. शुद्ध ज्ञान उरले. आपल्यावर भाऊंची कृपा आहे ही अनुभूतीही आली म्हणूनच हे संपादकीय लिहिण्यासाठी चैतन्याचा साक्षात्कार झाला. हुंकाराच्या पुढची अवस्था चैतन्याची आहे. त्या चैतन्याची ज्ञान, भक्ति, बुद्धी ही आवश्यक अंगे आहेत.

ज्ञानाने मन तृप्त होते. शुद्ध भक्ती फुलते. सहज वागणे ही समाधी होते. भक्तीतला विवेक जागा होतो. जगण्याचा परम भावार्थ उमजतो. विश्वातला एकांत आपण आहोत ही भावना होते. ज्ञानी माणसाला सर्व उपचार चैतन्यच वाटतात. ज्ञानाचे बोलणे मौनाचे सर्वस्व होते. ज्ञानाला शरण जावे. उपासनेला पुसत असावे अशी भावना होते. स्वात्मभावापुढे सारे फिके वाटते. हा उदार अनुभव भवरलालजींच्या सहवासातून कायम मिळत राहीला. त्यांनी लिहिलेल्या 'ती आणि मी' या आत्मचरित्राने स्वानुभवाची मेजवानी दिली. संत ज्ञानदेवांच्या भाषेत सांगू का

***"ययालागी हे बोलणे। अनुभवामृतपणे।***
***स्वानुभूति परगुणे। वोगरिले।।"***

चैतन्याने सद्विरूचीसंपन्न झालेले मोठ्या भाऊंचे मन केवळ चैतन्य सौरभातच गुंतून पडले नाही तर बुद्धी आणि विवेकाची कास धरीत ते त्याच्याही पलिकडे गेले. म्हणूनच त्या चैतन्याचा दिव्य प्रकाश आजही 'जैन इरिगेशन' च्या रूपाने आपल्याला अनुभवता येतो आहे. या चैतन्याचा आरंभ विवेकापासून होतो असे मला वाटतो. कदाचित आपले मत वेगळे असूही शकेल. कारण प्रत्येकाचा अनुभव निरनिराळा आहे. पण नित्यानित्य विवेक महत्वाचा आहे. बुद्धिपेक्षा विवेकाचे सामर्थ्य आहे. बुद्धित आकलनाचे काहीसे सामर्थ्य दिसते. विवेकात पृथ:करणाला महत्व आहे. बुद्धी धारणेशी



*आपली पत्नी सौ. कांताबाई यांच्यासमवेत मोठे भाऊ*


# भाऊ, तुमच्या चैतन्याची किरणे आम्हावरही पडोत!

आपल्या चैतन्यातून सहकाऱ्यांचे चैतन्य जागृत करायचे आणि त्यांना काम उत्कृष्टपणे पार पाडण्यासाठी प्रेरणा देऊन प्रवृत्त करायचे ही म्हणावी तितकी सोपी गोष्ट नाही. कारण प्रत्येक माणसाचा स्वभाव, काम करण्याची प्रवृत्ती निरनिराळी असते. आशा-आकांक्षा लपलेल्या असतात. अशावेळी त्या सर्वांची एकजूट करून मोट बांधायची आणि त्यांना प्रत्येकाला कामासाठी आपले हृदय व्यापक करायला लावायचे यासाठी कुशल नेतृत्वाची, संघटकाची गरज असते. मोठ्या भाऊंचे नेतृत्व अतिशय वंदनीय व अभिमान वाटेल अशाच प्रकारचे होते. सहकाऱ्यांबद्दल त्यांच्या मनात प्रचंड विश्वास व स्नेहभाव होता. त्यांना सहकाऱ्यांच्या कामाची, ताकदीची पूर्ण जाणीव होती. "कोणत्याही कामाची शक्ती ही मानवी मनाच्या आतच असते, वेळ आली की ती आपोआप बाहेर येते. कामाला सुरूवात केली की, लक्षात येते, कधी कधी काम झाल्यावर कळतं, एवढी शक्ती आली कोठून?" असे भाऊ नेहमी म्हणायचे. समोरच्याच्या मनात कामासाठी प्रेरणा देऊन चैतन्य निर्माण करण्याची शक्ती भाऊंच्यामध्ये विलक्षण होती. त्यामुळे त्यांनी काम सांगितल्यावर कोणताही सहकारी, 'मला शक्य नाही, मला जमणार नाही' असे म्हणत नसे. नकारात्मक भाव त्याच्या मनात उपन्न होऊ न देता सकारात्मक दिशेने जाण्याची वाट दाखवण्याची भाऊंची जी कला होती ते एक वेगळ्या प्रकारचे चैतन्यच होते. त्यामुळे कितीतरी अवघड कामे भाऊंनी सवंगड्यांना बरोबर घेऊन पूर्ण केली. मात्र काम पूर्णत्वाला जाण्यासाठी त्यांनी सवंगड्यांच्या हातात ताकद दिली. त्यांना स्वातंत्र्य दिले, मोकळीक दिली. स्वत:ची बुद्धी वापरण्याची मुभाही दिली. यातून काम फत्ते झाले. कामाची व्यापकता वाढली. "आपल्या कामाचा थोडा जरी विचार केला तरी कामाचे महत्व लक्षात येते. तुम्ही किती काम करता यापेक्षा तुम्ही तुमच्या कामात किती जीव ओतता, हे महत्वाचे आहे." असे सहजपणे भाऊ जाता जाता बोलून गेले. त्यांचा हा विचार आत्मप्रकटीकरणाचे नवे दालन उघडण्याच्या दृष्टीने खूप महत्वाचा व चैतन्यदायी आहे. आपण जेंव्हा शांतपणे विचार करू तेंव्हा प्रत्येक कामातला जीव तळहाताच्या मुठीत धरून भाऊ, तुमच्या चैतन्याची किरणे कायम आमच्यावर पडत राहोत अशी आम्ही प्रार्थना करत राहू!



निगडीत आहे. विवेक चिंतनाशी संबंधित आहे. बुद्धी विजेसारखी आहे. विवेक समईसारखा आहे. बुद्धी कधी कधी विचाराच्या कड्यावरून कोसळते. विवेक कोणत्याही परिस्थितीत कोसळत नाही. बुद्धी स्वार्थपरायण असण्याची दाट शक्यता असते. विवेक नि:स्वार्थतेच्या अवकाशात खुलतो. बुद्धीला अहंतेची बाधा कळत-नकळत लवकर होते. विवेक अहंतेवर मात करतो. बुद्धीला नम्रतेचे भान असते. विवेकात नम्रता गृहीत असते. बुद्धीतून जगण्याची समीकरणे बाहेर पडू शकतात. विवेकात जीवनाच्या समीकरणांचे निरपेक्ष विश्लेषण असते. बुद्धी स्वत:साठी पक्षपाती होऊ शकते. विवेक पक्षपाताच्या अतीत असतो. बुद्धीचे निर्णय बुद्धीच्या मर्यादितून घेतले जातात. विवेकातून घेतलेला निर्णय जीवनाचे मूल्य होते. बुद्धीचे सामर्थ्य कधी कधी कळत नाही. विवेकातून बुद्धीच्या सामर्थ्याचे साधार विवेचन करता येते. बुद्धी जाणिवेला कधी कधी बाजूला सारते. विवेक जाणिवेला प्राधान्य देतो. सदसदविवेकबुद्धी मिळवायला विवेकी व्हावे लागते. बुद्धीतले तारतम्य लक्षात आले की, विवेक निर्माण होतो. बुद्धियोग शेवटी विवेकात लीन होतो. भवरलालजींच्या संपूर्ण जीवनाकडे डोळसपणे आपण पाहिले तर, चैतन्याचा प्रकाश त्यांच्या कर्मात लीन झालेला दिसतो. एकरूप झालेला दिसतो. हेच भाऊंच्या चैतन्याचं वैशिष्ट्य व वेगळेपण आहे. जयंतीच्या निमित्ताने त्यांच्यातील या चैतन्यतत्वाला अंत:करणपूर्वक नमस्कार करून माझ्या शब्दांना पूर्णविराम देतो.





# कान्हदेशाचा डंका वाजविणारा 'मरूभूमीचा' महाराष्ट्रपुत्र

**राजस्थानची भूमी ही केसरीया राजपूतांची तसंच व्यापार उदीम आणि उद्योगव्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांचीही. अरवली पर्वतापार पसरलेल्या मरूभूमीतून आपलं औद्योगिक साम्राज्य देशभर आणि जगभर पसरवणाऱ्या बिर्ला आणि बजाज यांच्या यशस्वीतेच्या कहाण्या आज जणू दंतकथाच बनून राहाव्यात इतक्या प्रसिद्ध आहेत. त्याच राजस्थानच्या वाटवंशातून ज्यांचे पूर्वज आले त्या भवरलाल जैन उर्फ मोठेभाऊ यांचे कर्तृत्व व विचारसरणी यांची महाराष्ट्रापुरती कहाणी काही वेगळी नाही.**

**प्रभाकर खोले**
जेष्ठ पत्रकार, पुणे
मोबा. ९९२२९१३६५१

खरं तर मराठवाडा आणि आजूबाजूचा भाग हे पूर्वापार पासून महाराष्ट्रीय मराठी साम्राज्यकर्त्यांची भूमी अगदी सातवाहनांच्या प्रतिष्ठान (पैठणा) पासून ते यादवांच्या देवगिरी (दौलताबाद) पर्यंत. अगदी शिवाजी महाराजांचे भोसले घराणेही इथलेच आणि राजमाता जिजाऊ-राजेही शेजारच्याच.

महाराष्ट्राला अध्यात्मिक, वैचारीक आणि साहित्यीक वारसा देणाऱ्या ज्ञानदेवांपासून एकनाथापर्यंत व पुढची संतपरंपरा देणाऱ्या मराठवाडा व त्याच्या आसपासचा भाग ही जशी परकीय आक्रमणांची भूमी होती, तशीच कलाकार, कलावंतांची उतारपेठही होती. थेट रामायण-महाभारत कालापासून तो आजपर्यंत उत्तरेला दक्षिणेशी जोडणारा तो महामार्ग होता व आजही आहे. म्हणूनच शांततामय सहजीवनाचा मार्ग सांगणारे बौद्ध भिक्शू आणि जैन श्रमणक यांच्या वास्तव्याचा मार्गही तोच होता. सम्राटांच्या


वाकोद-वडाळी गाव

राजस्थानी कुटूंबांपैकी एक होते जैन उद्योगसमुहाचे संस्थापक व अध्वर्यू पद्मश्री भंवरलालजी जैन यांच्या घराण्याचे मुळपुरूष.

**सव्वाशे वर्षांपूर्वी मारवाडातून**

गोष्ट फार जुनी नाही. जेमतेम सव्वाशे-१२७ वर्षांपूर्वीची. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्ध होता तो. शेवटच्या दशकात म्हणजे १८९७ मध्ये. सारा देश ब्रिटीशांनी व्यापला होता. मराठी साम्राज्य संपले होते, रणजीतसिंगाच्या शीखांचाही पराभव झाला होता अन १८५७ चे स्वातंत्र्यसमर अयशस्वी ठरून ब्रिटीशांनी एकछत्री अंमलाबरोबरच देशावर प्लेग-रोगराई आणि दुष्काळ-दारीद्र्याचा वरवंटा फिरत होता.

अशा वेळी आणखी काय व्हायचं शिल्लक आहे , बाहेर पडून संधी शोधू, नसल्यास निर्माण करू अशी आशा व जिद्द घेऊन त्या वाळवंटाबाहेर पडणाऱ्या काही जणांप्रमाणेच दोघं भाऊ घराबाहेर पडले. ते साल होतं १८९७ आणि गांव होतं राजस्थानातील मारवड भागातलं आगोळाई. जवारमल आणि छोटमल (जैन) हे ते दोघं बंधू अरवली पर्वत लागून गुजरात, मध्यभारत ओलांडून

कारकीर्दीमध्ये हजारो वर्षापूर्वी वेरूळची अजरामर शिल्पे अन अजिठ्यांची नयनरम्य साऱ्या जगाचा सांस्कृतिक वारसा असलेली चित्रे साकारणारी शिल्पी हात आणि त्यांना आधार देणारे धनिक, श्रेणिक हे ही इथेच येऊन पोहचले होते. आतापर्यंत म्हणजे हेमाद्री पंडीत (हेमाडपंत), गोपाल नायक, खोलेश्वर अशा नवरत्नांना पदरी बाळगणाऱ्या यादव राज्यकर्त्यांची हीच परंपरा होती. अशाच नशीब काढण्यासाठी मराठवाड्यात महाराष्ट्रपर्यंत येऊन पोहचलेल्या अनेक


वाघूर नदी


अजिंठा लेणी



मोठे भाऊ हे आपले वडिल हिरालाल, आई गौराई आणि पत्नी कांताबाई यांच्या समवेत

मजल-दरमजल गाठत आणि निधीत उपजिविकेच्या संधी शोधत थेट आजच्या महाराष्ट्राच्या उत्तर भागात म्हणजेच मराठवाड्याला खेटून असलेल्या खानदेशात येऊन पोहचले.

जळगांव जिल्ह्याच्या अजिंठा डोंगराच्या छायेत बसणाऱ्या आणि जगप्रसिद्ध अजिंठा लेण्यांच्या परिसरातच उगम पावून आसमंताला पोसणाऱ्या वाघूर या नदीच्या छत्रछायेमध्ये त्यांना आपल्या कायमच्या वस्तीच्या आणि पुढच्या पिढ्यांच्या विकासाच्या संधी डोळ्यांसमोर ठेवून वाकोद-वडाळी या गावात त्यांनी आपली पालं ठोकली अन मारवाडचे हे भटके बंधू खानदेशाचे, महाराष्ट्राचे झाले. भंवरलालजी ही त्यांची चौथी पिढी.

जवाहरमल थोरले तर छोटमल हे नावाप्रमाणे धाकटे. या भागामध्ये आपला जम बसेल असे वाटल्यावर त्यांनी आपापली कुटूंबे तिथे उभी केली. थोडी जमीन पैदा केली. काही गुरं दावणीला गोठ्यात बांधली आणि सपाटून कष्ट करण्याची आयुष्याची सुरूवात केली. पहाटे उठून गायीच्या धारा काढायची आणि दुध घरोघरी पोहचवायची. दिवसभर शेतात राबायचं. कोणत्याही मारवाडी कुटूंबाप्रमाणेच पहाटेपासून मध्यरात्रीपर्यंत त्यांना काम, साफसफाई, डागडुजी अन देखरेख या सर्वात बायकाबापूड्यांची साथ असायचीचं. त्यातून तर पुढची पिढी शिकत गेली. व्यवसाय-व्यवस्थापन मन लावून जमू लागले. जमीन, पाणी आणि प्रकृतीचा अंदाज येऊ लागला.

### शेती-व्यवसायातून सुरूवात

दुध व शेती यामधून धान्याच्या व्यापाराला आणि शेतीच्या व्यवसायाला सुरूवात झाली. हळूहळू शेतीबरोबरच त्यांचे वंशवृक्षही बहरत गेले. जवाहरमल यांना तीन मुले. सागरमल, मुक्तचंद आणि हस्तीमल. कुटूंब मोठं होतं. एकत्र होतं. सागरमल यांना पुत्ररत्न झाले, हिरालाल त्यांचे नांव.

आता कुटूंब वाढलं होतं. व्यवसाय शेतीही विस्तारली होती. मोठ्या कुटूंबात आणि व्यापार उदिमात सतत माणसांशी संबंध. प्रत्येकाचे आचार वेगळे आणि विचारही वेगळे. अशा वेळी वेगवेगळी मते असणाऱ्या आणि कृती करणाऱ्या अनेकांशी कसं वागायचं. त्यांना सांभाळून कसं घ्यायचं. याचं बाळकडू मुलांना घरीच मिळत होतं.

हिरालालजींचा विवाह गौराबाईंशी झाला. संसार सुखाने नांदू लागला. पण एक शल्य जिव्हारी बोचत होते. होणारं



हातगाडीवरून रॉकेल विक्री करताना मोठे भाऊ



जैन हिल्सवरील प्रक्रिया कारखाने

कोणतचं मूल जगत नव्हतं. त्यांना चार अपत्य झाली पण लगेचच देवाघरी गेली. सगळे उपाय थकले. आता काय करायचं? या विचाराने झोपच उडाली पण इलाज मिळेना. कुणीतरी सांगितलं, हे बाळ जन्मल्यावर हरिजनांच्या ओटीत टाका. ते जगेल! पाचवं मुल जन्मल्यावर तसचं करून पाहिलं. खरोखर मुल जगलं. ते मुल म्हणजेच भवरलाल. जैन उद्योग समुहाचे द्रष्टे संस्थापक अध्यक्ष आणि कृषीतंत्रज्ञानाचे प्रवर्तक. हरिजनांच्या ओटीत मुल टाकण्याची ही प्रथा किती योग्य आणि अयोग्य हे ज्याने त्याने आपल्या विश्वासानुसार ठरवावे. परंतु ज्यांना प्रेमाने, आदराने मोठेभाऊ ही आपलेपणाची उपाधी लावली जाते त्या भंवरलालजींच्या विचारसरणीतील सर्व जाती, धर्म, लिंग, वंश आणि विचारप्रणाली यांच्यामधील समभावाच्या भावनेचा उदगम या घराणेमधूनही झाला असेल. कदाचित भवरलाल नंतरचे कांतीलालही दैवाने कृपा केली. खानदेशाच्या मातीशी चार पिढ्यांपूर्वी जोडली गेलेली नाळ आणखी दृढ झाली.

**शेती-मातीच्या विकासाचा ध्यास**

१२ डिसेंबर १९३७ हा भवरलालजींचा जन्मदिवस. त्या दिवशी जळगांव जिल्ह्यातल्या वाकोद या गावी वाघूर नदीच्या किनारी भवरलालजींचा जन्म झाला. आपल्या आयुष्याची पहिली १० वर्ष त्यांनी याच गावात घालविली. वाघूर नदीच्या डोहात डुंबत, शेती बांधावरून धावत-फिरत गावातल्या तरण्या संवंगड्यांशी खेळत आणि मैत्री करत ते इथेच वाढले. ओसवाल-जैन समाजाचे सर्वसमावेश संस्कार आणि वाघूर-गिरणा-तापी या नद्यांच्या पाण्यावर पोसलेल्या भवरलालजींनी कौटुंबिक व्यावसायाबरोबरच शालेय व महाविद्यालयीन शिक्षणातही लक्ष दिले.

किंबहुना जळगांव येथून कायद्याचे पदवीधर शिक्षण घेऊन बाहेर पडल्यावर त्यांना भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये नोकरीही मिळाली होती. समाजात मानसन्मान, स्थिरता देणारे भरपूर पगार, सुखसोयी व निवृत्ती वेतन देणारी ही संधी त्यांना आयती चालून आली होती. पण भवरलालजींच्या





*ठिबक सिंचन साहित्याची देशात प्रथमच निर्मिती ही मोठ्या भाऊंची भारताला देणगी*

मनात काही वेगळेच करायचे विचार चालत होते. ज्या भूमीत आपण जन्मलो, ज्या प्रदेशात आपण वाढलो, ज्या नद्या-नाल्यांचे पाणी आपण प्यालेलो आहोत, ज्या समाजाने आपल्याला संस्कार दिलेत या सर्वांसाठी आपण काही तरी करावे ही इच्छा त्यांना रात्रंदिवस स्वस्थ बसू देत नव्हती.

### मातीशी पक्की जोडलेला नाळ

भवरलालजींची नाळ वाकोदच्या मातीशी आणि वाघूरच्या पाण्याशी पक्की जोडलेली होती. वयाच्या तेविसाव्या वर्षीच भवरलालजींनी शेती व्यवसायाकडे वळण्याचा निर्णय घेतला तो कायमचाच! आपली शेती, शेतीचे संवर्धन आणि व्यवसाय हा त्यांचा व्यवसायाचा निदीध्यास बनला. ते कौटुंबिक व्यवसायाकडे पुन्हा वळले आणि प्रत्यक्ष अनुभव व पुढचा विचार यांच्यासाठी ते परत वाकोदला आले. १९७२ ते १९७४ हे तीन वर्ष त्यांनी शेतीत, काळ्या मातीचा तिचा वात्सल्याचा अनुभव घेतला. तिची सुख-दु:खे आणि हास्य-वेदना स्वत: अनुभवल्या आणि शेतीमध्येच सर्वार्थाने झोकून देण्यात ते सिद्ध झाले. समाजाचे आशीर्वाद व शुभेच्छा, घरच्यांचे पाठबळ आणि जेमतेम सात हजार रूपयांची साठलेली पुंजी यांच्या जिवावर भवरलाल यांनी आपल्या पिढीजात व्यवसायात कृषीक्षेत्रामध्ये उडी घेतली. आपल्या कुंटूंबियांसमवेत भागीदारीमध्ये त्यांनी जैन उद्योग समुहाची मुहूर्तमेढ रोवली. पुढे जाऊन पूर्ण देशभर व जगभर त्या व्यवसायाचा वटवृक्ष पसरला. त्याआधी भवरलाल यांनी व्यवसायाचे स्वानुभव व शिक्षणही घेतले होतेच. शेतमालाच्या विक्री-खरेदी बरोबरच एका हातगाडीवर टाकीत केरोसीन (रॉकेल) घरोघरी विकण्याचे कामही त्यांनी केले. वाकोदच्या शेतीमधून त्यांना आलेले शेतीचे अनुभवांच्या जोरावर त्यांना लहरी पावसावर आणि बिनभरवशाच्या सिंचनावर अवलंबून असणाऱ्या भारतीय शेतीमधील काबाडकष्ट, अडचणी आणि त्यात राबणाऱ्या खानदेशी/भारतीय शेतकऱ्यांचे दैन्य तर समजत होतेच शिवाय त्यावर मात करण्यासाठी काय करावे लागेल याविषयी विचारही त्यांच्या मनात घोळत होते. या मातीला योग्य साधना व तंत्रज्ञानाची जोड कशी देता येईल



पाईपांच्या निर्मितीतून भाऊंना सिंचनाच्या क्षेत्रात मोठी क्रांती घडवून आणली.

आणि त्याच्या वापराने त्यांच्या जीवनात आर्थिक समृद्धी कशी येईल याचा शोध या मातीचा भुमिपुत्र संशोधकवृत्तीने घेऊ लागला.

### पहिली सार्वजनिक कंपनी

पाण्याची टंचाई आणि बऱ्याच ठिकाणी ओबडधोबड असलेल्या जमिनीत, "पाण्याचा प्रत्येक थेंब" काटकसरीने व पुरेपुर वापर करून मातीचा कस सुधारून पिकांचे योग्य ते संवर्धन हेच त्यांचे ब्रीद वाक्य होते. त्यांच्या विचारात, बोलण्य़ात, लेखनात ते सर्वत्र दिसू लागले, पेरले जाऊ लागले. त्यांच्याभोवतीचे वातावरण, त्यांचे जिवाभावाचे सहकारी, कार्यकर्ते यांच्यातही ते विचार भारले गेले होते. 'मातीच्या मदतीची क्रांतीच' अशा प्रकारे जळगावच्या मातीमध्ये सुप्तपणे उदयास येऊ लागली.

### आधुनिक तंत्रज्ञानाचा उदगाता!

भारतीय शेती जर किफायतशीर व परदेशांच्या तोडीची बनवायची असेल तर आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराशिवाय पर्यायच नाही हे त्यांच्या केंव्हाच ध्यानी आले होते. भवरलालजींना हे ही उमगले होते की, नुसत्या तंत्रज्ञानाच्या व यंत्रसामुग्रीच्या गप्पा मारून उपयोग नाही. शेतकरी शहाणा आहे, त्याला स्वत:चे आणि भूमातेचे हित समजते. तो कष्ट करायलाही तयार आहे. फक्त गरज आहे आधुनिक तंत्रज्ञानाची आणि संशोधक वृत्तीची. नेमके तेच मोठ्याभाऊंनी केले. यासाठी त्यांनी कंबरही कसली.

१९८० च्या दशकामध्ये जगभर पाण्याचा योग्य पण काटकसरीने वापरासंबंधी ठिबक सिंचन, तुषार सिंचन यासारख्या सुक्ष्म सिंचनाच्या पद्धती लोकप्रिय होत्या.






ईस्त्राईलसारखा वाळवंटातला चिमुकला देश हे त्यांच्या यशाचे जागते उदाहरण आहे. जगाकडे विशेषत: प्रगत समृद्ध शेतीकडे लक्ष होतेच. त्यांनी ठिबक सिंचन म्हणजेच "ड्रीप इरिगेशन" या पद्धतीची भारतामध्ये मुहूर्तमेढ रोवण्याचा निर्णय मोठ्याभाऊंनी घेतला. त्यासाठी त्यांनी खाजगी क्षेत्रामध्ये शेतीला पाणी पुरवठ्यासाठी पीव्हीसी (पॉलीव्हीनाईल क्लोराईड) पाईप हे टिकाऊ व स्वस्त पण दर्जेदार पाईप तयार करण्याचा कारखाना सुरू केला.

जसजसा नव्या साधनांचा प्रसार होऊन वापर होऊ लागला तसतशी त्याच्या उत्पादनात व वैविध्ये-वैशिष्ट्ये यात वाढ करण्यासाठी आवश्यकताही भासू लागली. मग त्यांनी ठिबक सिंचनाचा प्रसार व प्रचार व संवर्धन करण्याकरीता आपल्या कारखान्यामध्ये सावर्जनिकीकरण करण्याचा निर्णय घेतला. जैन पाईप हा खाजगी क्षेत्रातला खानदेशातला पहिला सार्वजनिक कारखाना.

**जैन हिल्स माळरानावर फुलवले नंदनवन!**

आपल्या विचार आणि कृतीची यशस्वी पडताळणी त्यांनी प्रत्यक्ष प्रात्याक्षिकांद्वारे करून दाखविली. जळगांव-पाचोरा रस्त्यावर एका पडीक माळरानावर त्यांनी ठिबक सिंचन प्रणालीने झाडांची, रोपांची लागवड करून एक सुंदर नंदनवन फुलविले. सुंदर शेती फुलवली. त्याचप्रमाणे फळांवर पक्रिया करणारा जैन फूड, ॲग्री पार्क नावाने भव्य प्लान्टची निर्मिती केली. जैन फूड प्लान्टमधून विविध फळावर (आंबा, पेरू, चिकू, कांदा, जांभूळ) प्रक्रिया करून तो माल जगभर पाठविला जातो. तिथेच त्यांनी सौर ऊर्जेची "जैन सोलर" नावाची उत्पादने सुरू केली. आपल्या दूरदृष्टीने, संशोधक वृत्तीने व नवनवीन तंत्रज्ञानाच्या अवलंबाने पडीक, बरड माळरानाचा कायाकल्प करून त्यांनी 'जैन हिल्स' व 'जैन व्हॅली' ची ओळख पूर्ण भारतभर व जगभर निर्माण केली. आज तिथे असंख्य शेतकरी, विद्यार्थी, परदेशी लोक ते बघण्यासाठी येत असतात.

**दु:खे, संकटे झेलत कृषिविकास!**

हे सर्व करताना भवरलालजींवर दु:खाचे डोंगर कोसळले. आधी त्यांना मातोश्री गौराबाईंच्या निधनाला तोंड द्यावे लागले नंतर आपल्या चार दशकांपेक्षा अधिक काळ साथ देणाऱ्या सहचारिणी सौ. कांताबाईंचा वियोग झाला. आपली सुख-दु:खं बाजूला सारून शेतकऱ्यांच्या हितासाठी अक्षरश: जग पालथे घालणाऱ्या या प्रज्ञावंताला हृदयविकार, शस्त्रक्रिया, पेसमेकर यां व्याधींचाही सामना करावा लागला. हे सर्व करत भारतीय कृषि उद्योगात आधुनिक तंत्रज्ञानाचे वरदान देणारा हा द्रष्टा माणूस इतिहासाच्या पानावर कायमचा अजरामर झाला.

## भवरलालजींची कृती, मती आणि उक्ती

# सुसंस्कृत क्रियावंताचा विचार बोध।



**भवरलालजी जैन हे एक विलक्षण, विचक्षण संयुग होतं. विविधरंगी परंपरा, वैविध्यपूर्ण संस्कृती, अनेकवचनी जीवनशैली आणि टिप कागदाप्रमाणे सर्व काही (परंतु निवडक असे) टिपण्याची वृत्ती यांनी तयार झालेलेअशी व्यक्तिमत्वे शतकातून एखादीच दैवी कृपेमुळे आपल्यामध्ये जन्म घेतात. आपल्याला झालेल्या बोधाचे समाजात योगदान देतात आणि आपल्या विचारांचा बहुमूल्य ठेवा पुढील पिढयांकरीता मागे ठेवून जातात.**

**सौ. अस्मिता खोले**
पत्रकार - पुणे

डॉ. भवरलालजी हिरालालजी जैन, वाकोदसारख्या छोटया गावात, वाघूर नावाच्या छोट्याश्या नदीकाठी वास्तव करून असलेल्या मुळच्या मारवाडच्या परदेशातून आलेल्या आणि शांतीची महती सांगणाऱ्या, जैन धर्माचे पालन करणाऱ्या, कुटुंबाच्या चौथ्या पिढीचे घटक, सभोवतालच्या निसर्ग व समाजाच्या सकारात्मक उन्नतीसाठी आपले व्यार्कश, आपल्या कुटुंबाचे व आपल्या समाजाचे योगदान असते हे नैसर्गिकरित्या आवश्यक व योग्य आहे, असे मानणाऱ्या सुशिक्षित, प्रगतीशील गांधीजींच्या मूल्यांवर विश्वास ठेवून मानवाची प्रगती साधण्यावर त्यांचा दृढ विश्वास होता. त्याच विचारधारेला धरून त्यांच्या सर्वकृती, विश्वास, निवेदने अन भाषणे होत. त्यांनी वेळोवेळी व्यक्त केलेले विचार, त्यांचे लेखन, भाषणे, वक्तव्ये आणि वृत्तपत्रे, रेडीओ, दूरचित्रवाणी इत्यादी विविध माध्यमांना दिलेल्या मुलाखती यामधुनही नेमके हेच तर प्रतिबिंबीत होते.

भवरलाल जैन उर्फ मोठेभाऊ यांचे काही निवडक आणि निकालाबाधीत योग्य व समर्पक अशा विचारांचा त्यामागील त्यांची भूमिका सष्टकरणांसह घेतलेला हा मागोवा.

जगणे सार्थक होण्यासाठी जीवनात ध्येय हवे. साधू-संत आणि विचारवंत सगळे एकच म्हणतात की, मनुष्याचा जन्म दुर्लभ आहे. मग हा मानवजन्म आपल्याला का मिळावा? कसा आणि कशाला? याचाही विचार करायलाच हवा.

आपण पृथ्वीवर कशासाठी आलोत? आपला जन्म कशासाठी झाला आहे? त्यामागे काही योजना आहे का? अशी योजना असती तर ती कशी व काय असेल? असे शेकडो, हजारो प्रश्न आपोआप निर्माण होतात. व्हायलाही हवेत, आपल्याला पडायला हवेत. आपण आपल्या जगण्याला विशिष्ट अर्थ आणि आपल्या व्यक्तिमत्वाला सुसंस्कृतपणा कशा प्रकारे आणायला हवा. याचाही विचार प्रत्येकाने केलाच पाहिजे आणि तो विचार सकारात्मकतेने करायलाच हवा. एकदा का तुम्ही तो विचार करायला लागलात तेव्हा तुमचे ध्येय, लक्ष निर्धारीत होईल तेही सकारात्मक दृष्टीने. आपल्या ध्येयाकडे पोहचण्यासाठी तुम्ही मार्गाचा शोध घ्याल. त्या लक्षाकडे नेणाऱ्या रस्त्यामध्ये काही अडचणी असतील तर त्या सोडविण्यासाठी, अडथळे असतील तर दूर करण्यासाठी तुम्ही उपाय शोधाल, ते अंमलात आणाल व त्यावर मात करीत अखेर तुमचे लक्ष साध्य कराल. हे करताना तुम्ही जीवनात तुम्ही निश्चितपणे कोणते तरी सकारात्मक योगदान नक्कीच केलेले असेल. जगताना केवळ उदरनिर्वाह करून आयुष्य काढणे नव्हे तर माणूस म्हणून जगताना शारिरीकदृष्ट्या सुदृढ, मानसिकदृष्ट्या समाधानी, क्रियाशील असायला हवे. आनंदी, अभिरूची संपन्न, सुखी जगता यावे, इतरानांही सुखी करता यावे. जीवनाच्या अशा सार्थक जगण्यातील जीवनात ध्येय हे हवेच.


नातवंडासोबत निवांतक्षणी मोठेभाऊ

### संस्कारांचे विद्यापीठ - आई आणि कुटूंब

घर सांभाळणे हेसुद्धा मोठ्या व्यवसायापेक्षा कमी नाही. व्यवसायात तुम्हाला मदतीला अनेक माणसे असतात. अन सहकारीही पण आई किंवा घरातली गृहीणी ही बहुशः एकटीच असते. सर्व कामे, जबाबदाऱ्या ती एकटीच सांभाळत असते. प्रत्येक वेळ ती निभावून नेते, यशस्वीपणे - कारण इतर सगळे चुकूही शकतात, पण आईच्या चुकीला वाव नसतो, माफीही नसते. आई ही घरातील सर्वांना एकत्र बांधून ठेवणारी प्रेम वाटणारी स्नेहमयी आहे आणि तसेच ती सर्वांवर संस्कार करणारी, सर्वांना वळण लावणारी प्रेमळ शिक्षिकाही आहे, घडीविना असलेली, प्रेमळ. जसा कोणालाही उद्योग व्यवसाय सोपा नसतो, अनेक आव्हाने असतात, आयत्या वेळी समोर येणाऱ्या अडचणी आणि संकटे असतात. तीच गोष्ट घराचीही असते. घर चालवतांना गृहीणींना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते एवढेच नव्हे तर त्या सोडवाव्याही लागतात.

दिवसभर काम करून आपण घरी पोहोचल्यावर आपल्यासमोर घरातल्या अडचणींचा पाढा वाचायला सुरूवात केली तर आपले जनस्वास्थ्य ठीक तरी राहील का? आपली झोप उडून जाईल, कार्यक्षमतेवर आणि निर्णयक्षमतेवर परिणाम होईल व काहीही काम होणार नाही.

नोकरी असो, व्यवसाय असो वा शिक्षण असो, घरातली गृहीणी म्हणजेच आई (किंवा पत्नी, मुलांची आई) हिचे महत्व आणि स्थान अनन्यसाधारण आहे. मुलांना जन्म देणे, त्यांचे संगोपन व वर्धन करणे आणि त्यांना सुसंस्कारीत करणे हे सोम्यागोम्याचे काम नाही आणि एकट्या दुकट्याचेही नाही, पण आई हे सर्व करत असते, विनातक्रार आणि बिनबोभाट म्हणूनच आई हे मुलांवरील संस्कारांचे विद्यापीठ आहे व तसेच कुटुंबातील वडीलधारेही!



दर्शनातून आई-वडिलांचे आशीर्वाद मिळविताना मोठे भाऊ

### उद्योजकांनो स्वतःची इमेज बदला

स्वातंत्र्योत्तर काळात व्यापारी आणि उद्योगपती यांचे चित्र जवळपास खलनायक म्हणून रंगवण्यात आले, विशेषतः बॉलीवूडच्या चित्रपटांमधून. त्यामुळे उद्योगपती म्हणजे समाजाचे शोषण, गलेलठ्ठ झालेले घृणापात्र नागरिक असा त्यांचा दुलौकिक वाढायला लागला. राजकारण्यांच्या, विशेषतः विरोधी पद्धतीयांच्या बोलण्यांमधून व्यापारी उद्योगपती आणि शासन यांची अभद्र युती असा हेटाळणीपूर्वक उल्लेख नेहमीच केला जातो. १९९१ नंतर आर्थिक सुधारणांचे वारे वाहायला लागून अर्थ व्यवस्थेभोवतालचा शासकीय विळखा सैल होण्यास सुरवात झाली आणि व्यापारी तथा उद्योजकांना थोडीफार प्रतिष्ठाही प्राप्त व्हायला सुरूवात झाली पण एवढ्यावरच समाधान मानायचं का? हे एवढं, इतकंच पुढे आहे का? मला व्यक्तिशः असे वाटते की आपली स्वतःही म्हणजेच व्यापारी - उद्योजकवर्गाची इमेज (प्रतिमा) जी सध्या आहे ती बदलणे अतीव आवश्यक आहे. आज या परस्परविरोधी आणि बेधुंद आरोप व संशय-भयगंडाच्या अवस्थेत देश जणू थांबल्यासारखा झाला आहे.

याचे मूळ कारण म्हणजे आजचा आपला समाज भयमुक्त नाही. भीती व भयगंडावर आधारीत समाज ही अवस्था लोकशाहीत आणि एकूणच निकोप सामाजिक पर्यावरणाला घातक आहे, असते.. खूपच घातक! भयमुक्त समाज हा लोकशाहीचा पाया आहे, आणि सद्दढ आर्थिक संपन्नतेचा कणा आहे. याउलट भयभीत समाजाचे घटक परस्परांना जाचक ठरून तो समाज आंतर्विरोध, कलह, अत्याचार आणि हिंसाचाराला आमंत्रण देत असतो आणि यापैकी कोणताही एक घटकसुद्धा आपल्या समाजाला तथा आर्थिक विकासाला छेद देऊ शकतो.


पाण्याने गच्च भरलेली तळी पाहताना भाऊंचे मन आनंदाने उंचबळत असे

हे दुष्टचित्र बदलायचे असेल तर आपण सर्व व्यापारी आणि उद्योजक मित्रांनी सामाजिक बांधीलकीची जाण ठेवून, आर्थिक संपन्नतेचा बडेजाव न करता किंवा प्रदर्शन न मांडता विश्वस्ताची भूमिका बजावणे आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी पावले उचलणे अपरिहार्य आहे. म्हणजेच उद्योजक व्यापाऱ्यांनी स्वतःची प्रतिमा प्रयत्नपूर्वक बदलून समाजाभिमुख प्रतिमा निर्माण करणे आवश्यक आहे. म्हणूनच म्हणतो की; "स्वतःची इमेज बदला, सर्वकाही बदलेल!"

**जलसुरक्षिततेच गावची समृद्धी-**

आपल्या देशाला, राज्याला, जिल्ह्याला आणि बहुसंख्य गावांना आज सर्वाधिक तीव्रतेने भेडसावणारा एक प्रश्न कोणता असेल, तर तो पाण्याचा प्रश्न! मग ते पाणी पिण्याचे असेल, धुण्याचे असेल, शेती पिकाचे असेल की जनावरांच्या चाऱ्या, पिण्याचे असेल. ज्या गावाला पाण्याचा प्रश्न काळजीत टाकत नाही, असं एकही गाव देशात आजमितीला शिल्लक नाही.

पाण्याची समस्याही प्रत्येक गावामध्ये बिकट अशीच झाली आहे, गावा गावामध्ये कित्येक किलोमीटरची पायपीट करून पिण्याचे पाणी आणावे लागते. मोठमोठी महाकाय धरणे झाली अन कोरडीही पडली. कितीतरी विहीरी खोदल्या गेल्या पण त्यांचे झिरपे आटले, खोलच खोल बोअरवेल झाल्या पण भूगर्भातील पाण्याचे साठे, जलस्त्रोत नाहीसे होऊ लागले. काही जलसाठे प्रदूषित होऊ लागले. कुठे समुद्राच्या आक्रमणामुळे तर कुठे रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनींचे हजारो एकरांचे पट्टे खारवटल्यामुळे, अनेक ठिकाणी विशेषतः मोठ्या शहरांत व औद्योगिक वसाहतीमध्ये सांडपाणी व रसायनयुक्त पाणी मिसळले गेल्यामुळे नद्या-नाले, तलाव आणि कालवे फेसाळ करून प्रदूषित झाले आहे. कुठे थांबणार हे सर्व, कसं मिळणार प्रत्येकाला शुद्ध आणि पुरेसं पाणी


मला तरी निश्चितपणे असे वाटते की आपापल्या गावांमध्ये लहानमोठे नाले असतील, ओढे असतील, एखादी छोटी मोठी नदी वाहत असेल तर त्यावर बंधारा कसा बांधता येईल, त्यातून वाया जाणारे पाणी, कसं भरता येईल, साठवता येईल याचा विचार आपण प्राबल्याने, प्राथमिकतेने करायला हवा - कारण, "पाण्याशिवाय जीवन नाही!"

**शोध, महात्मा गांधींचा, गांधीजींच्या विचारांचा-**

महाराष्ट्रात विदर्भातल्या वर्धा जिल्ह्यातील महात्मा गांधी वैद्यकशास्त्र संस्था (द महात्मा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस) ही एक मोठी महत्वपूर्ण अशी एकमेव वैद्यकीय संस्था आहे की जे देशामधील ग्रामीण भागातलं एकमेव महाविद्यालय आहे आणि स्वतः महात्मा गांधी यांनी पायाभरणी स्थापना केलेलं एकमेव इस्पितळ आहे. विश्वविख्यात ऑक्सफर्ड विद्यापीठाकडून शाबासकी मिळालेलं ते एकमेव इस्पितळ तर आहेच पण त्याला ग्लोबल सेफ मदरहूड एवार्ड, सर्वोत्तम व्यवस्थापन असलेलं ग्रामीण इस्पितळ अशी अनेक देशी-परदेशी पारितोषिके आणि पुरस्कार मिळाले आहेत.

मी जेव्हा या विद्यापीठाला भेट दिली तेव्हा गांधीजींच्या अनेक कल्पना व प्रेरणा तिथे प्रत्यक्ष आचरणात आणल्या जात आहेत, हे पाहून मला अतिशय आनंद झाला तसेच समाधानही वाटले. उदाहरणार्थ, श्रमदान या विद्यापीठात एकही झाडूवाला किंवा सफाई कामगार नाही आणि तिथे असणारा प्रत्येकजण आणि सर्वजणच सफाईची कामे करताहेत हे पाहूनच किती बरं वाटलं. त्याहीपलिकडे जाऊन तिथे श्रमदानाची आठवडी शिबिरे भरताहेत हे ऐकून आणखीनच बरं वाटलं.

त्याचबरोबर तिथे आरोग्य तपासणीसाठी प्रत्येकी तीन ग्रामीण कुटुंबे दत्तक घेणे, तातडीच्या वैद्यकीय मदतीसाठी परा-वैद्यकीय (पॅरा-मेडिकल) शिक्षण मिळालेले स्वयंसेवक तयार करणे यासारखी अनेक विधायक आणि रचनात्मक कामेही चालत असतात.



*जैनहिल्सवर गांधीतीर्थची केलेली उभारणी हे मोठ्या भाऊंचे आयुष्यातील मोठे स्वप्न होते.*

गांधीजींनी सात पापांची एक यादी तयार केली होती. चारित्र्यहीन शिक्षण आणि कामाशिवाय संपत्ती ही त्यातली दोन प्रमुख पापकर्मे होती. आजचं जग हे दुःखी तणावपूर्ण आणि औदासिन्याने भरलेले आहे. इथे एलोपॅथी या वैद्यकीय शिक्षणाबरोबरच सिंपथी (सहानुभूती) आणि एम्पथी (सहभूती) या दोन पॅथी..........



विचार अभिव्यक्तीसाठी शब्द हे केवळ माध्यम आहे आणि आपले विचार म्हणजे आपल्या अंर्तआत्म्याचा आवाज आहे - भवरलाल जैन

भवरलाल भाऊ आणि आमचा संपर्क प्रथम १९८८ मध्ये आला. आमच्या शेतीला पाण्याची कमतरता होती. बाहेरून पाणी उचलून आणण्याशिवाय सिंचनाची व्यवस्था होऊ शकत नव्हती. म्हणून १०-१५ मैलांवर हतनूर धरणाचे जे पाणी उपलब्ध होते ते तांदुलवाडी येथून उपसा जलसिंचन योजना करून आणण्याचा आमच्या काही शेतकऱ्यांचा विचार होता. प्रत्येकाची वैयक्तिक उपसा योजना करण्याची तयारी होती. पण प्रश्न होता, पीव्हीसी पाईप कसे उपलब्ध होतील याचा. म्हणून आम्ही त्यावेळी जैन इरिगेशन कंपनीत वरीष्ठ पदावर असणाऱ्या व भाऊंच्या अत्यंत जवळच्या असणाऱ्या श्री. एस.व्ही. पाटील यांच्याशी संपर्क केला.



**श्री. दगडू किसन (डी.के.) महाजन**
मु.पो. वाघोदा, ता. रावेर,
जि. जळगाव. मो. ९४२२९७४७२२

# केळी उत्पादकांची समृद्धी ही भवरलाल भाऊंची देणगी





डी.के. महाजन हे मोठ्या भाऊंचा चिनावल गावात सत्कार करताना

त्यांच्यामार्फत मोठ्या भाऊंपर्यंत पोहोचलो. त्याकाळी पाईपलाईन करण्यासाठी बँकेमार्फत आम्ही कर्ज घेण्याचे ठरविले. पण कर्ज मंजूर होऊन हातात रक्कम यायला चार महिने लागणार होते. तो पर्यंत थांबणे शक्य नव्हते. तातडीने पाणी आणून पिक जगविणे महत्वाचे होते. म्हणून मोठ्या भाऊंना जाऊन आम्ही भेटलो. त्यांना सर्व अडचण सांगितली. आम्ही ८-१० लोक वेगवेगळ्या उपसा सिंचन योजना करणार आहोत. काही चार इंची, पाच इंची आणि मी सहा इंची पाईपलाईन करणार होतो. त्यावेळी मला पाईपलाईनसाठी सहा लाख रूपये खर्च येणार होता. भवरलाल भाऊंनी आमचे सगळ्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि चार-पाच महिन्यांसाठी आम्हाला उधारीवर पाईप दिले. त्यामुळे वेळेत योजना पूर्ण झाली आणि पिकालाही जीवदान मिळाले.

ही उपसा जलसिंचन योजना करत असताना मोठ्या भाऊंनी आम्हाला सल्ला दिला की, केळी लावताना ठिबकचा वापर करा. आमच्या मनात प्रथम शंकेची पाल चुकचुकली. पाटाने एवढे पाणी खच्चून देऊनही १२-१५ किलोच्या पुढे घड पडत नाही आणि या थेंब थेंब पाण्यावर कुठं काय घड लागतीलं? पण भाऊंचा मान ठेवायचा आणि त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवायचा म्हणून आम्ही सर्वांनी दोन-तीन एकर क्षेत्रावर ठिबक संच केळी बागेला लावला. पीक उत्तम आले आणि २२-२५ किलोचा घड पडला. त्यानंतर १९९४ मध्ये पहिल्यांदा भाऊंनी आयात केलली टिश्यूकल्चर केळीची पाचशे रोपे मला लावायला दिली. आमच्या अगोदर श्री. राजाराम गणू महाजन आणि श्री. इच्छाराम सरोदे यांनी केळी बागेला ठिबक सिंचन लावला होता. त्यांचे ठिबक संच यशस्वी न झाल्यामुळे त्यांनी तो संच खुंटीला लावून ठेवला होता. परंतु आम्ही चिकाटीने सुरूवातीला थोड्या क्षेत्रावर ठिबक संच बसवून तो यशस्वी कसा होईल यासाठी नेटाने प्रयत्न केले. ठिबक संचातून अमुक मिनीटातून इतके लिटर पाणी पडेल असे आम्हाला सांगण्यात आले होते. हवामान व वातावरण परिस्थितीनुसार पाण्याचा डिस्चार्ज कमी जास्त करावा लागतो व कमी जास्त काळ ठिबक संच चालवावा लागतो हे त्यावेळी भाऊंनी आम्हाला समजावून सांगितले होते. उन्हाळ्यात पाणी देण्याचे प्रमाण वाढवावे लागते. आमच्या जळगांव जिल्ह्यात उन्हाळ्यात तापमान ४५ ते ४८ अंशापर्यंत जाते. या काळात ठिबक संच जास्त चालवावा हे तापमानामुळे आमच्याही लक्षात आले होते. तात्विक (थेरॉटिकल) ज्ञान काही वेळा अपुरे पडते. या तात्विक ज्ञानाला अनुभवाची जोड दिली तर ते ज्ञान पूर्णत्वाच्या दिशेने जाते. हा धडा भाऊंनी आम्हाला अगोदरच दिलेला होता. त्यामुळे तत्वज्ञानाशी अनुभवाची सांगड घालून आम्ही ठिबक सिंचनाचे तंत्रज्ञान केळी बागेत यशस्वीपणे राबविले.

ठिबकवर लावलेली माझी कंदावरची केळी बाग पाहिल्यानंतर मोठ्या भाऊंनी १९९४ मध्ये मला टिश्यूकल्चर केळीची पाचशे रोपे अर्धा एकरासाठी लावायला दिली. हा प्रयोग होता. त्याच्या आधी मी रोबोस्टा, शेंदुर्णी, आंबेमोहार, बसराई अशा जातींची सुमारे पाच ते आठ हजार केळी रोपांची लागवड करायचो. भाऊंनी मला आयात केलेली रोपे दिली त्यात ग्रॅन्ड नैन बरोबरच झेलीग आणि विल्यम या जातीची ही रोपे होती. टिश्यूकल्चर केळी लागवडीसाठी पहिल्यांदा मोठ्या भाऊंनीच सगळे मार्गदर्शन मला केले. हा प्रयोग अत्यंत यशस्वी झाला. केळी बाग तर उत्तम आली शिवाय केळीचा घड २५ ते ३० किलोचा पडला. एवढा मोठा व एकसारखे घड आम्ही आयुष्यात कधी पाहिले नव्हते. पूर्वी

केळीचे पारंपारिक उत्पादन जेंव्हा आम्ही घेत होतो तेंव्हा सरासरी १३ ते १५ किलोचा घड पडायचा. दीड ते दोन वर्ष ती बाग सांभाळावी लागायची. नंतर ती केळी कापायला यायची. म्हणजे जवळपास दोन वर्षे ती झाडे शेतात राहत होती. जून २०२० मध्ये केळी लावली तर २०२२च्या जानेवारीत ती कापायला यायची. १९-२० महिने बाग सांभाळल्यानंतर डिसेंबरात आम्ही त्या रानांत गहू पेरायचो.

बाग जशी विरळ होत जाईल तशी गव्हाची पेरणी करायची. सगळी झाडे पूर्वी एकावेळी कापायला यायची नाहीत. काही वेळा २५-३० टक्के झाडांना घडही लागायचे नाहीत. पण भवरलाल भाऊंनी टिश्यूकल्चर केळीची रोपे, त्याला ठिबक संचाने पाणी आणि त्या ठिबक संचामधूनच फर्टिगेशन (खते देणे) करण्याचे तंत्रज्ञान विकसित करून ते आम्हा शेतकऱ्यांना दिल्यामुळे ९८ ते १०० टक्के झाडांना घड लागून ते एकाच वेळी कापणीसाठी उपलब्ध झाले. त्यामुळे बाजारपेठेतली वाहतुकही सोपी झाली. नंतर १९९५-९६ पासून टिश्यूकल्चर ग्रॅन्ड नैनची रोपे भाऊंनी मोठ्या प्रमणावर आम्हांला उपलब्ध करून द्यायला सुरूवात केली. त्यामुळे चार हजार, आठ हजार, दहा हजार याप्रमाणात रोपे लावित गेलो आणि आता दरवर्षी ५० हजाराहून अधिक रोपे लावतो.

पूर्वी साडे चार बाय पाच फूटावर केळीची रोपे लावायचो. आता माझी सगळी लागवड सहा बाय सहा फूटावर आहे. दोन हजार सालापर्यंत ३० ते ४० टक्के शेतकऱ्यांनी टिश्यूकल्चर केळीची ग्रॅन्ड नैन जातीची रोपे वापरायला सुरूवात केली होती. टिश्यूकल्चर रोपे, ठिबक संच, फर्टिगेशन यांची सांगड बसली तर बागा किती उत्तम पद्धतीने उभ्या राहतात हे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांनी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिल्यामुळे शेतकऱ्यांचा जैन कंपनीवरचा विश्वास वाढत गेला. केळी पिकातील तज्ज्ञ व कंपनीचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ.के.बी.पाटील यांचे नियमित मार्गदर्शन आम्हाला तेव्हा मिळायचे आणि आजही मिळते. त्यांनी पाणी, खते, औषधे याबाबतचे जे मार्गदर्शक वेळापत्रक बनवून दिलेले आहे ते केळी उत्पादक बागायतदारांसाठी आज भगवद्गीते सारखे आहे. त्याचे नित्य पठन व वाचन आम्ही करून त्याप्रमाणे कृती करतो.

२००२-०३ साली जैनच्या टिश्यूकल्चर केळी रोपांचे मी सहा खोडवे घेतले होते. टिश्यूकल्चर रोपांचा खोडवाही खूप सुंदर आला होता. त्यामुळे ती खोडवा बाग पाहण्यासाठी स्वतः भवरलाल भाऊ, भारताचे हॉर्टिकल्चर कमिशनर डॉ.एम. एल.चौधरी हे आमच्या शेतात आले होते आणि त्यावेळी चिनावल गावात त्याच बागेत केळी निर्यातीसंबंधी परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. २००२ साली बेंगलोर येथे आंतरराष्ट्रीय केळी परिषद झाली होती. २४ देशातले शास्त्रज्ञ त्या परिषदेला उपस्थित होते. भाऊंचाही परिषद आयोजित करण्यात मोठा पुढाकार होता. या परिषदेत मला टिश्यूकल्चर केळीच्या लागवडीबद्दल 'नल्लावजाई' हा पुरस्कार केंद्रीय कृषीमंत्री श्री.अजित सिंग यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.




*केंद्रीय कृषीमंत्री अजित सिंग यांच्या हस्ते केळी उत्पादन व निर्यातीसाठी पारितोषिक स्वीकारताना वाघोदा येथील डी.के. महाजन*

मोठ्या भाऊंच्या मुळेच हा पुरस्कार मला मिळाला होता.

खान्देशातली आणि विशेषतः जळगावची केळी निर्यात झाली पाहिजेत. ती जगाच्या बाजारपेठेत पोहोचली पाहिजेत आणि शेतकऱ्याला त्याने उत्पादित केलेल्या केळींचा भाव चांगला मिळून तो श्रीमंत झाला पाहिजे. तो आत्मनिर्भर होऊन स्वतःच्या पायावर मजबुतीने उभा राहिला पाहिजे हे भवरलाल भाऊंचे स्वप्न होते. त्यासाठी ते आयुष्यभर धडपडले. २००४ साली मोठ्या भाऊंच्या मार्गदर्शनाखाली व महाबनाना या संस्थेच्या सहाय्याने आम्ही पहिल्यांदा दुबईत केळी निर्यात केली. चांगल्या स्थितीत केळी तिथे पोहोचली. निर्यातीची चर्चा नंतर आमच्या भागात व शेतकऱ्यांमध्ये सुरू झाली. पण काही ठराविक काळातच निर्यात होऊ शकते. वर्षभर निर्यातीसाठी त्या गुणवत्तेची केळी उपलब्ध होणे अवघड आहे हे आमच्या लक्षात आले. सुरूवातीला न्हावी गाव व त्याच्या बाजूचा परिसर नंतर मधला टप्पा व नंतर मध्यप्रदेश अशा प्रमाणात निर्यातीसाठी केळी उपलब्ध होऊ लागली . केळी निर्यातदार व्यापाऱ्यांच्या संबंधांवर ही मालाची उपलब्धता होऊ लागली. वर्षभर चांगल्या गुणवत्तेची केळी उपलब्ध नसतात म्हणून वेगवेगळ्या परिसरात व टप्प्या टप्प्याने लागवड व्हायला पाहिजे. सगळी केळी लागवड एकाच वेळी करू नका असे मोठ्या भाऊंनी आम्हांला सुचविले. एवढेच नव्हे तर वर्षभर लागवडीसाठी रोपे उपलब्ध करून देऊन त्यांच्या वाढीचे वेळापत्रकही बनवून दिले. त्यामुळे आता वर्षभरात केळीची केव्हाही लागवड केली तरी चालू शकते हे शेतकऱ्यांच्या लक्षात आले. आमच्या जळगाव जिल्ह्यातली केळी फेब्रुवारी-मार्च ते जुलै पर्यंत निर्यातीसाठी चांगली असतात.



केळी निर्यातीसाठी भवरलाल भाऊंनी खूप प्रयत्न सातत्याने केले. हे त्यांचे स्वप्न होते. त्यामुळे त्यासाठीच्या कामाचा ध्यास त्यांना सतत लागलेलाच होता. निर्यातीसाठी केळी कशा प्रकारची हवीत याचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना दाखविण्यासाठी त्यांनी जळगावातल्या जैन हिल्सवर एक पथदर्शी प्रकल्प (मॉडेलप्लॉट) उभा केला होता. एके दिवशी मोठ्या भाऊंनी सायंकाळी चार वाजता मी, वसंतराव महाजन, श्री. बोंडे आणि श्री. पाचपांडे सर यांना जैन हिल्सवर तो केळीचा प्लॉट पाहण्यासाठी बोलविले. संध्याकाळी ७ वाजेपर्यंत म्हणजे सुमारे तीन तास आम्ही त्या केळीच्या बागेत भाऊंबरोबर चर्चा करीत होतो. या तीन तासात त्यांनी बागेतले केळीचे ५ ते ७ घड आम्हांला कापून दाखविले. केळी कशी कापायची व कशी पॅकिंग करायची हे ही शिकविले. केळी निर्यातीचे संपूर्ण इन्फ्रास्ट्रक्चर त्यांनी पहिल्यांदा जैन हिल्सवर उभे केले. २०१० पर्यंत ७५ टक्के लोक टिश्यूकल्चर केळी रोपांची लागवड करू लागले होते आणि आता तर ९५ ते ९८ टक्के लोक टिश्यूची ग्रॅन्डनैन जातीची रोपेच लावतात. एवढेच नव्हे तर १०० टक्के शेतकऱ्यांनी केळी बागेला ठिबक संच बसविलेला आहे. आता कोणीही पाटाने व प्रवाही पद्धतीने निदान आमच्या खानदेशात आणि महाराष्ट्रात तरी केळी बागेला पाणी देत नाही. अशीच अवस्था द्राक्ष पिकाची देखील आहे. ठिबक सिंचनाचे तंत्रज्ञान व साहित्य भारतात सर्वप्रथम निर्माण करून भवरलाल भाऊंनी सिंचनाच्या क्षेत्रात मोठी क्रांती केली आहे. किंबहुना त्यांच्या अथक प्रयत्न व ध्यासामुळेच खानदेशी व महाराष्ट्रातील केळींनी जगाची बाजारपेठ पाहिली आहे. आता सध्या जैनची केळीची ६० हजार रोपे दरवर्षी मी लावित असून एक खोडवा घेतो. पण रोगराई वाढते म्हणून जास्त खोडवे घेण्याचे बंद केले आहे. २००६ साली खोडव्याचा जेव्हा मी प्रयोग केला तेव्हा क्षेत्र नवे होते. मात्र दुसऱ्या तिसऱ्या वर्षानंतर बरेच रोग यायला चालू होते असे माझ्या लक्षात आले. सीएमव्ही हा रोगतर आता 'कॉमन' झाला आहे. रावेर तालुक्यात मागील ७०-८० वर्षांपासून केळीवर केळीचे पीक घेतले जाते आहे. त्यामुळे जास्तीत जास्त काळजी घ्यावी लागते. मी मागील काही वर्षांपासून केळी काढल्यानंतर आर्वीचे पीक घेतो. काही शेतकरी कपाशी लावतात किंवा पपईचे पीक घेतात. पण पिकांचा फेरपालट आवश्यक आहे. केळीच्या निर्यातीकरिता निर्यात गृह काढण्यासाठी मोठे भाऊ खूप आग्रही होते. त्याबाबत आमच्याशी त्यांनी वारंवार चर्चा केल्या, पण ते निर्यातगृह उभारण्यात आम्हाला काही अडचणी होत्या. मी स्वतः ५० वर्षांपासून केळीचा व्यापार करतो आम्ही येथून केळी विकत घेतो आणि दिल्लीच्या व्यापाऱ्यांकडे पाठवितो. आमची वार्षिक उलाढाल २० ते २२ कोटींची असून वर्षभर ट्रकमधून माल जात राहतो. २०१० पर्यंत दिल्लीला माल रेल्वेने जात होता. रेल्वेगाडीला २० डबे असायचे ते डबे साधे होते. एका डब्याची क्षमता २० टनाची होती. १९७०-७५ पासून



वाघोदा गावाला भेटी प्रसंगी मोठ्याभाऊसोबत डी.के.महाजन, वसंतराव महाजन, बाबुराव पाटील, दत्तू महाजन (लोणी), विश्वनाथ वामन पाटील, डॉ. सुभाष चौधरी, ना.धो. महानोर, डॉ. के.बी. पाटील या केळी उत्पादकांसह रावेर, यावल तालुक्यातील जैन वितरक बंधू

रेल्वे डब्यांचा आकार, प्रकार बदलत गेले. २००० सालापासून गाडीला नवे डबे जोडले गेले. पूर्वी 'बीएक्सटी' च्या वॅगन रॅक्स मिळत होत्या. ही रेल्वेगाडी तिसऱ्या दिवशी दिल्ली मार्केटमध्ये पोहचत होती. त्यामुळे १०-१५ वर्षे माल नियमित जात होता. वाहतूक चांगली व्यवस्थित होती. तत्कालिन सरकार त्या रेकवर भाड्यात ५० टक्के सवलत देत होते. नंतर भाडे सवलत ३० ते ३५टक्यांवर आली. याकामी सरकारला आम्ही विनंती करीत होती की भाडे सवलत कमी करू नका. पूर्वी ५-६ वेळा श्री. शरद पवार हे केंद्रात कृषीमंत्री असताना त्यांनी रेल्वेमंत्र्यांकडे शब्द टाकून आमची वाहतुक भाडे सवलत चालू ठेवली होती. ही सवलत मिळवून देण्याच्या कामी भवरलाल भाऊंनी आम्हांला खूप मदत केली होती. ते स्वतः श्री शरद पवार यांना भेटायला येऊन आमची केळी उत्पादक शेतकऱ्यांची बाजू मांडली होती.

करपा रोग जेव्हा केळी पिकावर मोठ्या प्रमाणात आला तेव्हा २०१० साली भवरलाल भाऊंना घेऊन आम्ही केंद्रात कृषी मंत्री असलेल्या पवार साहेबांना भेटलो. त्यांनी मोठ्या भाऊंना करपा रोगासंबंधीची सर्व माहिती गोळा करून उपाययोजना कशी करायची यासंबंधीचा अभ्यासपूर्वक प्रस्ताव पाठवावा असे सुचविले. १५ दिवस मी, वसंतराव महाजन, केळी उत्पादक संघाचे अध्यक्ष असे रोज जैन हिल्सवर भवरलाल भाऊंकडे जात होते. केळीपीक तज्ञ श्री. के बी. पाटील यांची मदत घेऊन ५५ पानांचा प्रस्ताव आम्ही तयार केला. हा प्रस्ताव तयार करण्याच्या कामात मोठ्या भाऊंची खूप मदत झाली. प्रत्येक गोष्ट त्यांनी बारकाईने नमूद केली. श्री. शरद पवार साहेबांनी केळीवरील करपा रोगाच्या नियंत्रणासाठी आम्हाला पॅकेज दिले. ती मदत ७ वर्षे मिळत राहिली. मोफत सर्व औषधे मिळाली. ७हजार रुपयांचे कीट ७०० रुपयांना शेतकऱ्यांना मिळायचे.

भवरलाल भाऊंनी केळीच्या पिकात टिश्यू कल्चर रोपे, ठिबकचे तंत्रज्ञान, पीव्हीसी व एचडीपीई पाईपांची निर्मिती आणि फर्टिगेशनचे तंत्रज्ञान आणून मोठी क्रांती घडवून आणली. त्यामुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी भाऊ 'मसीहा' म्हणजे देवदूतच बनले. त्यांनी शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी व आर्थिक प्रगती व्हावी म्हणून देह चंदनासारखा झिजविला. त्यामुळेच कंदाच्या लागवडी कमी होऊन टिश्यूकल्चर रोपांच्या लागवडी वाढल्या. केळीचे उत्पादन व उत्पादकता वाढली. मुख्य म्हणजे ठिबकच्या वापराने पाण्यात खूप मोठी बचत झाल्याने केळीच्या लागवडी तीन ते चार पटीने वाढल्या. या सर्व नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाची भवरलाल भाऊंनी केळी बागायदारांना जी उपलब्धता करून दिली त्यामुळे शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारले. सर्वांगीण प्रगती झाली. मुख्य म्हणजे आमच्या भागातली शेतकऱ्यांची मुले उच्च शिक्षणासाठी परदेशात गेली. ८० टक्के घरांमध्ये आता चार चाकी वाहने आणि ७० टक्के मजुरांकडे दुचाकी वाहने आली आहेत. केळी बागायतदारांना समृद्धीची ही देणगी भवरलाल भाऊंच्यामुळे प्राप्त झाली हे आम्ही कधीही विसरू शकत नाही. येत्या १२ डिसेंबरला त्यांची जयंती आहे. त्यामुळे त्यांच्या आठवणींना येथे उजाळा दिला आहे. त्यांच्या पवित्र स्मृतीस मी विनम्रपणे अभिवादन करून थांबतो.

# स्वर्ण शिखर यों लहराये ।

उसने देखा दूर-दूर, फैली थी सुन्सान भूमि ।
अनगढ पत्थर इधर-उधर, उदासीन वीरान भूमि ॥

शत-शत वर्षों से शापित, वह भूमि शान्त सोयी थी ।
किसी राम के चरण स्पर्श के, सपने में वह खोयी थी ॥

कब तक मुझको इस प्रकार, शापित यों रहना होगा ।
क्या रो-रो कर ही मुझको, यों ही मिट जाना होगा ?

सुनकर माँ की सुप्त पुकार, उसका दिल भर आया ।
शापित माँ की मुक्ति पर, उसने सब दाँव लगाया ॥

हाथों ले कुदली, खुरपी, झुंझ गया माई का लाल।
लोग हँसे पागल है, यह कभी न होगा इतना काम ॥

भूमिपुत्र मंजिल को पाने, दिनरात एक करता था।
साथ आ गये संगी-साथी, कार्य सतत बढता ही था।

वर्षों बीते मंज़िल पायी, माँ शापों से मुक्त बनी।
एक राम के चरण स्पर्श से, भू सुजलाम् सुफलाम् बनी ॥

बने निर्मिती केन्द्र, शिल्प, नन्दनवन भी बहराये ।
भूमिपुत्र के सृजनों से, स्वर्ण शिखर यों लहराये ॥


- प्रा. सुंदरलाल बी. मल्हारा





## जैन इरिगेशन सिस्टिम्सची यशोगाथा ।

# इवलेसे रोप लावियेले द्वारी त्याचा वेलू गेला गगनावरी





**मराठी आणि भारतीय शेतकऱ्यांना अत्याधुनिक शेतीचे आणि जलनियोजनाचे महत्व पटवून देतानाच त्या तंत्रज्ञान व उपकरणांची सुलभ व स्वस्त उपलब्धीही करून देण्यासाठी साडेचार दशकांपूर्वी डॉ.भवरलाल जैन म्हणजेच मोठे भाऊ यांनी काही हजार रुपयांच्या भांडवलावर स्थापन केलेल्या कौटुंबिक व्यवसायाने आज हजारो कोटी रुपयांची प्रचंड उलाढाल असलेल्या जागतिक उद्योग समूहाचे स्वरूप धारण केले आहे. भवरलालजींचे द्रष्टेपण जैन कुटुंबियांची आधुनिक दूरदृष्टी आणि या सर्व उपक्रमाची शेतकऱ्यांना पटलेली उपयुक्तता, ह्यांचेच हे फलस्वरूप आहे. जैन इरिगेशन सिस्टिम्स लिमिटेड या कंपनीची कार्यपद्धती, वाटचाल आणि आज तिने प्राप्त केलेले स्थान यांचा घेतलेला हा लेखा जोखा!**

**अरूण आजगांवकर**
सिनीयर व्हा. प्रेसिडेन्ट
जैन इरिगेशन सिस्टिम्स लि.,

फार पूर्वी नाही १९६३ साली, महाराष्ट्रात ६५ वर्षांपूर्वी येऊन वाकोद येथे स्थायीक झालेल्या या ओसवाल-जैन कुटुंबाची संचित कमाई गोळा करून फक्त सात हजार रुपयांच्या भांडवलावर भवरलाल जैन ऊर्फ मोठे भाऊ यांनी शेती बी-बियाणे आणि औजारांच्या कौटुंबिक व्यवसायास भागीदारी फर्म स्वरूपात सुरूवात केली. आपल्या देश-परदेशातील संधी, उच्च शिक्षणामुळे



मोठ्याभाऊनी आपल्या कार्याची सुरूवात केरोसीन व पेट्रोल व्यवसायापासून केली


जैन पाईप फॅक्टरीत प्रत्यक्ष मशिनवर काम करताना भाऊ

दारात चालून आलेली प्रशासकीय सेवेतील नोकरी आणि वैयक्तिक उन्नतीकरता इतरत्र स्थायिक होण्यासाठी खुणावणाऱ्या योजना या सगळ्यांना नाकारून त्यांनी आपल्या जळगाव जिल्ह्याच्या आणि खान्देशाच्या भूमीमध्येच पाळेमुळे आणखी खोलवर रूजवायचा क्रांतिकारी निर्णय घेतला. आपण जगाची ओळख करून घेण्यापेक्षा सारं जगच आपली ओळख करण्यासाठी आतुर होईल, असे काही तरी करण्याचे मनामध्ये निश्चित त्यांनी केले होते. त्यासाठी आपल्या वाकोद या मूळ गावी, तिथल्या ओबडधोबड पण माया लावण्यास प्रेमाचा वर्षाव करणाऱ्या भूमी व माणसांना जवळ करण्याचा व जवळून जाणून घेण्याचा त्यांनी निर्णय घेतला आणि तिथेच पुढच्या जैन क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली गेली.

### रॉकेल विक्रीची हातगाडी

गाव, शेतकरी आणि शेती यासाठी कोणतेही काम करण्यात कधीच भवरलाल यांनी कमीपणा मानला नाही, शेतकऱ्याला काय हवे आणि त्याने काय करायला हवे, याचा ते अचूक अंदाज घेत. अगदी सुरवातीला शेतीच्या औजारांबरोबरच शेतकरी-गावकऱ्यांना लागणारे अत्यावश्यक असे रॉकेल म्हणजेच केरोसिन ते एका टाकीच्या हातगाडी मधून भरून घरोघर जाऊन पुरवित. तेव्हा आजच्यासारखी खेडोपाडीच काय, पण निमशहरी भागातही वीज पोहोचली नव्हती आणि दिवे स्वयंपाक एवढेच काय, लहान सहान यंत्रेही रॉकेलवर (डिझेल/पेट्रोल ऐवजी) चालवली जात. “शेती हा एक उज्वल भवितव्य असलेला व्यवसाय आहे”, हे तत्व मनावर बिंबलेल्या भवरलालजींनी मग आपल्या मती आणि ताकदीनुसार ते प्रत्यक्षातही आणायला सुरूवात केली. त्यामुळे शेतकऱ्यांना लागणारे पाईप, औजारे, ठिबक सिंचन प्रणाली व इतर कृषी औजारांची विक्री त्यांनी सुरू केली, त्या त्या उत्पादनाची डीलरशिप घेऊन, त्याबरोबरच त्यांनी खते, बियाणे, तणनाशके कीटकनाशके या शेतात लागणाऱ्या पूरक मालाच्या विक्रीलाही सुरूवात केली. आपण कृषिपूरक उत्पादनांचा पाया आणखी विस्तृत करण्यासाठी आणि शेतकऱ्याला एकाच छताखाली आवश्यक त्या सर्व वस्तू तथा सेवा पुरवण्याच्या दृष्टीने त्यांनी ट्रॅक्टर, मळणी व फवारणी यंत्रे अशांचीच डीलरशिप घेतली. या दूरदृष्टीमुळे आधी जेमतेम ५-१० लाखांपर्यंत असणारी त्यांची वार्षिक उलाढाल १९७८ सालापर्यंत तब्बल अकरा कोटी रुपयांपर्यंत जावून पोहोचली होती म्हणजेच केवळ काही वर्षांमध्ये आपला व्यवसाय भवरलालजींनी जवळ-जवळ

दोनशे पटींनी वाढवला होता, शेतकरीभिमुख समाजाभिमुख राहण्याच्या आणि सदैव भविष्यावर लक्ष ठेवून राहण्याच्या त्यांच्या दूरदृष्टीचे व अभ्यासक वृत्तीचेच हे फळ होते.

**जल व्यवस्थापनावर भर**

शेतीसाठी आणि एकंदरीत मानवी जीवनातच पाण्याची असलेली आवश्यकता आणि त्यामुळेच पाण्याचे मोल व मूल्य हे भवरलालजींइतके तेव्हा क्वचितच कुणी जाणले असेल. एक तर त्यांच्या मारवाडच्या वाळवंटी, पाणी टंचाईच्या परंपरेतून रक्तात भिनलेली पाण्याच्या जतनाची ओढ त्यांना स्वस्थ बसून देत नव्हती (त्यांचे वडील हिरालालजी तर त्यांच्या पादातधळे एक पाटलाण मारवाडी पद्धतीचे तर दुसरे मराठी पद्धतीचे वापरत असत आणि दोन्ही प्रदेशांच्या पापटांशी बांधीलकी जाणवत असत) आणि दुसरे म्हणजे मराठी, ओबड धोबड मातीशी असलेली निष्ठा त्यांना चैन पडू देत नव्हती, त्यामुळेच या मातीसाठी आणि त्यातील पाणीपुरवठा - सिंचन व्यवस्थेसाठी काहीतरी करण्याची तळमळ त्यांच्या मनामध्ये सतत घर करून होती. त्यादृष्टीने त्यांनी जलवितरण सिंचनाच्या विविध काटकसरीच्या, किफायतशीर, आटोपशीर व स्वस्थ प्रणाली शोधणे, त्यांचा प्रसार-प्रचार करणे आणि त्याची स्थानिक शेतकऱ्यांना माहिती व शिकवण देऊन वितरणाची उपलब्धी करून देणे यासाठी प्रथमपासूनच प्रयत्न सुरू केले होते.

१९८० मध्ये ‘जैन पाईप’ या नावाने त्यांनी पीव्हीसी पाईप्सचा कारखाना उभारला. हे पाईप्स न गंजणारे, वजनाला खूप हलके, टिकावू व स्वस्त होते तसेच विविध आकारांत बसवण्याजोगे होते.

भारतामध्ये ‘सूक्ष्म जल सिंचन योजना’ म्हणजेच मायक्रो इरिगेशन सिस्टीम्स प्रथम आणण्याचे श्रेयही जैन इरिगेशनकडेच जाते. कमीतकमी पाण्याच्या वापरात अधिकाधिक पिके घेण्याचे हे तंत्र भवरलालजींनी इस्त्रायल व इतर देशांत पाहिले होते. सूक्ष्म जल सिंचनामध्ये ‘ठिबक सिंचन’ (ड्रिप इरिगेशन) आणि ‘तुषार सिंचन’ (स्प्रिंक्लर इरिगेशन) यांचा समावेश होतो. १९८८ मध्ये ‘जैन ड्रिप’ या नावाने सूक्ष्म जल सिंचन प्रणालीचा भारतात प्रथम उत्पादनाला सुरूवात केली ती भवरलालजींनी!

अर्थात हे सर्व तयार करण्याबरोबरच ते सर्वत्र दाखविले पाहिजे. त्यासाठी प्रशिक्षणही झाले व नित्य नव्या सुधारणांसाठी संशोधनही आले. मग संशोधन प्रदर्शन प्रशिक्षण या सर्वांसाठी ‘जैन आर एन्ड डी’ या केंद्राची स्थापना लगेच पुढच्या वर्षी म्हणजे १९८९ मध्ये केली गेली.



जळगाव - पाचोरा रस्त्यावरची एक पडीक जमीन विकत घेऊन तिथे भवरलालजींनी अक्षरशः नंदनवन उभारले. त्यांचे नाव झाले, ‘जैन हिल्स’ तिथे राबणाऱ्यांची कल्पकता आणि



जैन हिल्सयेथील सौर विद्युत प्रकल्प व जलसंधारण कार्याचे अवलोकन करतांना मोठे भाऊ सोबत अशोक जैन, अतुल जैन व सहकारी

मेहनत व योजकता यांच्या जिवावर त्या मालदानी दगडातही पाझर फुटला. तिथे उत्कृष्ट पिके, कलमे, रोपे, वाणे तयार होऊ लागली, ग्रीन हाऊस व पॉली हाऊसेस तयार होऊन नवनवीन प्रयोग केले जाऊ लागले. १९९१ मध्ये प्लॅस्टिक शीट बनवण्याचा कारखाना सुरू झाला तर १९९४ मध्ये जैन पी.ई. पाईप्सचा. १९९४ मध्येच कंपनीने संशोधन व विकासात (रिसर्च एन्ड डेव्हलप्मेंट-आर एन्ड डी) मोठी पावले उचलून ऊती संवर्धन (टिश्यूकल्चर) सौर शक्तीवर चालणारे वॉटर हीटर, भाज्यांचे निर्जलीकरण (व्हेजिटेबल डिहायड्रेशन) या क्षेत्रांमध्ये संशोधन करण्याच्या दृष्टीने मोठी पावले उचलण्यास सुरवात केली. ही कामे विनाअडचण व विनाअडथळा पार करता यावेत यासाठी वेगळ्या, स्वायत कंपन्याही स्थापन करण्यात आल्या. (जैन टिश्यूकल्चर, जैन सोलर इ.) त्यानंतर लगेचच म्हणजे १९९६ मध्ये फळांवर प्रक्रिया करण्याचा उद्योग सुरू करण्यात आला.

**देशी - विदेशी कंपन्यांचा ताबा**

जैन इरिगेशनची उलाढाल व मालमत्ता यावेळेपर्यंत भवरलालजी आणि सहकाऱ्यांच्या कुशल हाताळणीमुळे शेकडो कोटींच्या घरात जाऊन पोहोचली होती. कंपनीकडे रोख गंगाजळी आणि गुंतवण्यायोग्य रक्कमही बऱ्यापैकी साठली होती. तिचा उपयोग भवरलालजींनी उत्पादन व उद्योगाचा विस्तार व नव्या, वैविध्यपूर्ण उत्पादन करणाऱ्या पूरक कंपन्या विकत घेण्यासाठी केला. बदललेल्या सहस्त्रकामध्ये (एकविसावे शतक) यावर जास्त भर आणि रोख राहिला.

२००४ साली आंध्र प्रदेशातील हैद्राबाद येथील पाईप उत्पादक कंपनी विकत घेतली तर २००५ मध्ये तामिळनाडू येथील. २००६ साली आंध्र प्रदेश, गुजरात, उत्तराखंड येथील पाईप, फळ प्रक्रिया व इतर कारखाने ताब्यात घेतले.

२००६ मध्ये जैन ने परदेशांवर स्वारी करून अमेरिकेतल्या निर्जलीकरण व इतर अशा दोन फॅक्टऱ्या विकत घेतल्या तर २००७ मध्ये अमेरिकेतलीच एक आणखी एक कंपनी घेतली तर 'नानदान' ही कंपनी विकत घेऊन इस्त्रायलमध्येही प्रथम प्रवेश केला. २००८ साली द मशीन ही कंपनी विकत घेऊन स्वित्झरलँडमध्ये पाय रोवून युरोपात प्रवेश केला तर लगोलग २००९ साली तुर्कस्तानमध्ये एका मोठ्या प्रकल्पाची उभारणी सुरू केली.

मात्र याचवेळी 'जैन' चे भारतातले लक्ष मुळीच कमी झाले नव्हते आणि महाराष्ट्र-खान्देश ही तर कंपनीची मूळ कार्यभूमी होती. त्यामुळे २०१० मध्ये इथे कंपनीने बायोगॅसपासून १.७ मेगावॅट वीजनिर्मितीचा प्रकल्प उभारला, जैन सोलर पंपिंग ही सौर ऊर्जेवरील प्रणाली स्थापन केली तसेच फोटोव्होल्टाइक सेल पॅनेल जुळणीची कामगिरी सुरू केली.

दरम्यान परदेशातील घोडदौड चालूच होती, याच वर्षी कंपनीने इंग्लंडमध्ये (यू.के.) स्लीफोर्ड - कृषी प्रक्रिया व वितरण कंपनी ताब्यात घेतली तर आणखी एक अमेरिकन (यू.एस.एन.) सिंचन कंपनी विकत घेतली. लगेचच पुढच्या वर्षी म्हणजे २०११ मध्ये आणखी एक स्वित्झरलँडची कंपनी 'प्रोटूल' ताब्यात घेतली. २०१२ साली 'व्हाइट ओक' ही अमेरिकन शीतीकृत अन्य कंपनी (फ्रोझन फूड) तर २०१५ मध्ये 'प्युअरसेन्स' ही सेन्सिंग व इमेजिंगची अमेरिकन कंपनीही जैन ने ताब्यात घेतली. २०१८ मध्ये इस्त्रायलची 'गॅव्हिश कंट्रोल सिस्टिम्स' ही कंपनी विकत घेतली होती. यादरम्यान भारतामध्येही कंपनीचे कार्य जोमाने चालू होतेच, सौर जलपंपांची (जादा शक्तीच्या) निर्मिती व उभारणी,



*प्रक्रियाकरून तयार केलेले मसाल्याचे विविध पदार्थ पाहताना मोठेभाऊ*



*१९९७ साली क्राफर्ड रिड मेमोरियल अवार्ड स्विकारताना कंपनीचे व्यवस्थापकिय संचालक अनिल जैन*

व्यावसायिक प्रणालीत जागतिक प्रवाहाशी अनुकूल राहण्याच्या दृष्टीने) बदल, किरकोळ विक्रीच्या प्रवाहात सामील होण्यासाठी आमरस या कंपनीचे उद्घाटन जैन प्लम्बिंग सिस्टीम्स, ड्रिप स्वयंचलित प्रणाली (स्मार्ट क्लीन) अशी देशांतर्गत प्रकल्प उभारणी व व्यवसाय प्रगतीची घोडदौड चालू होतीच.

**अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय सन्मान**

भवरलालजींची दूरदृष्टी चौफेर अभ्यासू तसेच संधीवर नजर ठेवून राहण्याची सजगता आणि त्यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांचे अतीव कष्ट अन व्यवहारचातुर्य यांच्या जोरावर (२०१६ पर्यंत) कंपनीचे बाजारमूल्य (मार्केट कॅपिलायझेशन) चाळीस हजार कोटी रुपयांच्याही पलीकडे जाऊन पोहोचले होते. ते आज आणखी कितीतरी वाढले आहे. कंपनीचे जागतिक पातळीवर आंब्यावरील प्रक्रिया शेतकी सौर पंप आणि संलग्न उत्पादनात जगात पहिले स्थान आहे, तर सूक्ष्म जल सिंचनाच्या बाबतीमध्ये जगात दुसरा नंबर आहे. कांदा व भाज्यांच्या निर्जलीकरणाच्या संदर्भातही जैन चा नंबर जगात तिसरा लागतो.

**पण एवढ्याने थोडेच भागते?**

कंपनीच्या जगभरात ३३ च्या वर उपकंपन्या आणि मालकीच्या कंपन्या आहेत ११ संबंधित कंपन्या व सहयोगी संस्था आहेत. जगातील सव्वाशेवर देशांशी कंपनीचे व्यापारीक संबंध व व्यवहार आहेत तर जगभर कंपनीचे जवळजवळ अकरा हजार वितरक व डीलर्स लाखो, नव्हे कोट्यवधी गिऱ्हाइकांशी व्यवहार सांभाळून आहेत. भवरलालजींची ही जेमतेम तीन साडेतीन दशकांमधली अतिशय भरीव व समाजाभिमुख कर्तबगारी पाहून त्यांना बावीस राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले असून इरिगेशन असोसिएशन या जागतिक संघटनेने पुरस्कृत केलेले अत्यंत महत्वाचे मानले जाणारे क्रॉफर्ड रीड स्मृती पारितोषिकही त्यांना बहाल करण्यात आले आहे. हा पुरस्कार मिळालेले ते पहिलेच भारतीय आणि दुसरे आशियन आहेत. त्यांना अनेक विद्यापीठांनी डॉक्टरेट (पी.एच.डी.) प्रदान केल्या आहेत.

भारत सरकारने २००८ साली पद्मश्री हा नागरी पुरस्कार देऊन मोठ्या भाऊंचा (भवरलालजी) यथोचित सन्मान केला.

**जैन इरिगेशनची कामगिरी**

१९८६ मध्ये स्थापनेपासून म्हणजे गेल्या फक्त ३५ वर्षांत जैन इरिगेशनने आता ताज्या आकडेवारीनुसार एक अब्ज अमेरिकन डॉलर्सचा पल्ला गाठला आहे. (भारतीय रुपयांमध्ये ही आकडेवारी साडेआठ हजार कोटी रुपये होते).

बारा हजार कर्मचाऱ्यांना थेट आणि आणखी कित्येक हजारो/लाखों हातांना काम देणाऱ्या या कंपनीचे मुख्यालय आजही जळगाव येथेच आहे. २५ फेब्रुवारी २०१६ रोजी भवरलालजी यांना देवाज्ञा झाल्यानंतर अध्यक्ष म्हणून त्यांचे ज्येष्ठ पुत्र अशोक जैन हे जबाबदारी सांभाळत असून दुसरे पुत्र अनिल जैन यांनी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पदाची जबाबदारी स्वीकारली आहे. तिसरे पुत्र अजित जैन यांनी सह-व्यवस्थापकीय संचालकाची जबाबदारी स्वीकारली आहे, चौथे पुत्र अतुल जैन हे सह-व्यवस्थापकीय संचालक असून इतर संचालकांमध्ये ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेन्द्र जाधव, श्रीमती नॅन्सी बेरी, मुकुल सरकार, शिशिर दलाल, योहानेस बूडेविन, अशोक दलवाई या आर्थिक औद्योगिक व अभियांत्रिकी क्षेत्रांतील तज्ज्ञांचा समावेश आहे.

# जलजीवन

धरती कहे इनसान से-
सूरज की इस गरमी से
तप्त हुआ है तन मेरा
जल बिना, जीवन अधूरा
सपना मेरा, कर दे पूरा ॥१॥

धरती कहे आसमान से-
तरस रहाँ है, मेरा आँचल
तुम हो, जल के बादल
बूँद बूँद तेरा, पाकर जल
हो जाये, हरियाली हलचल ॥२॥

धरती कहे सागर से –
जल से भरा है, तेरा तन
तेरे जल से होगा सुंदर बन
खुशहाली होगी, सुंदर मन
धरती पर, स्वर्ग सा आँगन ॥३॥

भाऊ इसलिये कहते हैं –
जल ही अपना जीवन है
प्रकृति का यही संस्करण है
हम अधूरे जल बिना है
जल बचा कर ही जीना है ॥४॥

- सुभाष पवार



# भवरलाल भाऊंची नाळ शेतकऱ्यांशीच जुळलेली

खानदेशात व विशेषतः जळगाव जिल्ह्यातील आमच्या यावल, रावेर तालुक्यात केळीची लागवड १९१८ - २० पासून सुरु झाली. त्यावेळेला बैलावरती मोटा चालायच्या आणि चामड्याच्या मोटेने विहिरीतून जे पाणी उपसले जायचे त्यावर केळी भिजायची. एक एकर केळी भिजायला२५ ते३० तास लागायचे रात्रीच्यावेळी चांदण्यात मोट चालवावी लागे. शेतकऱ्यांकडे आणि आमच्या घरी केळीची दीड ते दोन हजार खोडे असायची. दांड करून पाटाने पाणी भरायचो. उन्हाळयात खूप तापायचे. त्यामुळे शक्यतो रात्रीच्या वेळी पाणी भरायचो. केळीची लागवड फार पूर्वीपासून मुळात कोकणात होत होती. आमच्या खानदेशातील कोसूर व शेंदुर्णी गावचे काही लोक छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात कामाला होते. त्यांनी पहिल्यांदा २००-५०० कंद पोत्यात घालून आणले आणि ते येथे खानदेशात लावले. पण केळीची मोठ्या प्रमाणावर लागवड मागील शंभर वर्षापासूनच सुरु झाली.

ऑईल इंजिनाचा शोध लागून आपल्याकडे वापर सुरू झाल्यानंतर शेतकऱ्यांनी या ऑईल इंजिनावरती केळी लावायला सुरुवात केली. ही ऑईल इंजिन चालविण्यासाठी क्रूड ऑईल लागायचे. या क्रूड ऑईलची एजन्सी त्याकाळी भवरलाल भाऊंनी घेतलेली होती. आम्ही त्यांच्याकडून क्रूड ऑईल खरेदी करायचो. त्यामुळे ६५-७० वर्षापूर्वी आमचा प्रथम त्यांच्याशी संपर्क आला. या क्रुड ऑईलच्या अगोदर रॉकेलवर चालणारी जॉब मशिन्स आली होती. त्यावर आम्ही केळी लावायचो. पहिल्यांदा भूजल पाणीपातळी १० ते १५



**श्री. वसंतराव लक्ष्मण महाजन**

रा. चिनावल, ता.रावेर - (मो. ९४२२९७६३२७)

फुटावरच होती. रॉकेल व क्रूड ऑईल इंजिनांचा वापर सुरू झाल्यानतर ही पाणी पातळी २५ - ३० फुटावर गेली. रॉकेलच्या वापरामुळे विषारी गॅसेस तयार व्हायचे. त्यामुळे रोग वाढून लोकांचे मृत्यू व्हायला लागले. त्यामुळे रॉकेल मशिन्सचा वापर कमी झाला.

कुड ऑईल इंजिन्स जेव्हा आपल्याकडे आली तेव्हा या मशिन्ससाठी कर्ज मिळत नव्हते. केळी हे खूप कष्टाचे पीक होते. पण शेतकऱ्यांनी जिद्द धरली. पैसा उपलब्ध झाला. सेंट्रल रेल्वेची लाईन आल्यावर लोकांनी केळी लागवड वाढविली. पोत्यात केळी भरून ती झांसी, अलाहाबाद येथे विकायला घेऊन जात होते. पुढे पठाणकोट, पंजाब मेल, अमृतसर एक्स्प्रेस या रेलवेगाड्या सुरू झाल्यावर तिकडे केळी घेऊन जाऊ लागले. पैसे मिळत असल्यामुळे शेतकरी केळीची लागवड वाढवत राहिले. १९४० - ४२ च्या दरम्यान केळी पिकावर मोठा रोग आला. शेतकऱ्यांनी कुणीही केळी लावू नयेत असा फतवा ब्रिटिश सरकारने काढला. जवळपास

दोन ते तीन वर्ष शेतकऱ्यांनी केळीची लागवड बंद ठेवली. मग पुन्हा हळूहळू लागवड सुरू झाली.

केळी उत्पादन व विक्रीसाठी शेंदुर्णी व वाघोदा येथे पहिली सहकारी सोसायटी स्थापन झाली. त्यांनी शेतकऱ्यांना ऑईल इंजिन्स खरेदी करण्यासाठी मदत केली. रस्टन, यानमार, जापनीज या कंपन्यांची ५-७-१० हॉर्सपॉवरची इंजिन उपलब्ध झाली. ही इंजिन्स खरेदी करायला तेव्हा मुंबईला जावे लागे. पहिले ऑईल इंजिन जेव्हा निंबोरा स्टेशनवर आले तेव्हा ते पाहण्यासाठी हजारो लोक जमले होते. तेव्हा खासगी सावकार शेतकऱ्यांना पैसे देत नव्हते. दिले तर जमिनी लिहून घ्यायचे. त्या काळी वाफ्यात केळी झाडे लावायचे. वाफे उथळ चार-सहा पांच बोटे ठेवायचे. पाणी देणे हे फार कष्टाचे काम होते. जमिनीत ओलावा फारसा टिकत नसे. त्यावेळी शेतकऱ्यांकडे गुरे मोठ्या संख्येने असल्यामुळे शेणखत भरपूर प्रमाणात उपलब्ध होते व त्याचा वापरही प्रचंड होता. त्यामुळे केळी चांगल्या प्रतीची उपादित व्हायची. तीन-चार दिवसांनी दिल्लीला पोहोचली तरी माल जसाच्या तसा राहायचा.

आमच्या इथे ऑईल इंजिन सोसायटी काढली होती. ब-हाणपूर पासून ते चोपड्यापर्यंतच्या शेतकऱ्यांना सोसायटी इंजिन पुरवायची आणि या इंजिनांसाठी लागणारे ऑईल भवरलाल भाऊ, त्यांचे वडील हिरालाल शेठ, चुलते दलुभाऊ हे पुरवायचे. हे सर्व जण १० ते १२ वर्षे ऑईल विकायला आमच्या चिनावलच्या सोसायटीत यायचे. शेतकऱ्याला गरज असेल तेव्हा हे ऑईल उपलब्ध व्हावे म्हणून रात्री बेरात्री सुद्धा ते ऑईल घेऊन यायचे. मात्र त्यांची अट एकच असायची की, ऑईलचे पैसे रोख द्यावेत. शेतकरी ते द्यायचे. सुरुवातीला दोनशे लिटरच्या टाक्या ते चौकात ठेवायचे. नंतर टँकर आणायला लागले. पण शेतकऱ्यांची ताकद फक्त ३० ते ३५ लिटर ऑईलच एकावेळी घेण्याची होती. त्यामुळे टाक्या बांधल्या. भवरलाल भाऊ तेव्हा तरुण होते. कष्ट करण्याची प्रचंड उमेद व जिद्द होती. त्यांच्या अंगी कामाचा जो उत्साह होता त्याचे तेव्हा मला मोठे नवल वाटत असे. १९६० - ६२च्या सुमारास वीज आली. वीजेवर चालणारे कृषी पंप निघाले. पाण्याचा प्रचंड उपसा सुरु झाला. भूजल पातळी खोल गेली. खूप खोलवर विहिरी खोदायचा कार्यक्रम सुरू



केळीच्या बागेत मोठ्या भाऊंच्या समवेत डी.के. महाजन, वसंतराव महाजन आणि डॉ. अनिल ढाके.

झाला. रात्री लाईटचे बल्ब लावून शेतकरी विहिरीतले पाणी उपसून केळी बागा भिजवू लागले. अपघातांचे प्रमाण वाढले. दरवर्षी १४ - २० शेतकरी वीजेचा शॉक बसून मृत्यूमुखी पडू लागले. त्यावेळी आमच्या भागाचे खासदार असलेल्या डॉ. गुणवंत सरोदे यांनी लोकसभेत प्रश्न उपस्थित केला. त्यानंतर पीव्हीसी पाईपांचा शोध लागला आणि पाईपातून शेतीला पाणी सुरू झाले.

आम्हाला सुरूवातीला पीव्हीसी पाईप हवे होते. ते आमच्या भागात बनत नव्हते. भवरलाल भाऊही तेव्हा पाईप बनवत नव्हते. हतनूरचे धरण झाले होते. आम्हाला पाईपलाईन करायची होती. पाईप कुणाला मागायचे म्हणून आम्ही भवरलाल भाऊंकडे गेलो. त्यांना अडचण सांगून आम्हाला पाईप पाहिजेत असे सांगितले. भाऊंनी तेव्हा मद्रासहून पाईप मागविले व आम्हास दिले. त्यानंतर भाऊंनी पाईप बनवण्याची फॅक्टरी टाकली. भाऊंचे मोठे वैशिष्ट्ये म्हणजे, भाऊंनी पाईप उधारीवर दिला. पैसे नाहीत म्हणून पाईप द्यायचे नाहीत असे भाऊंनी कधीही केले नाही. शेतकऱ्याकडे पैसे आले की तो उधारी फेडेलच असा त्यांना ठाम विश्वास होता. त्यामुळे शेतकरी त्यांच्या दारातून विन्मुख होऊन कधीच परतला नाही. भाऊंनी शेतकऱ्यांना पीव्हीसी पाईप पुरविल्यामुळे आमच्या भागात केळीच्या लागवडी प्रचंड वाढल्या. वीज पंपामुळे पाण्याचा सतत उपसा होत राहील्यामुळे उन्हाळ्यात पाणी खूप कमी राहायचे. काही ठिकाणी विहीरी व बोअरवेल्स आटल्या. त्यामुळे बागा कश्या भिजवायच्या असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे उभा राहीला.

शेतकरी संकटात सापडले आहे हे पाहताच भवरलाल भाऊ धावून आले. त्यांनी १९८६-८७ साली ठिबक सिंचनाचे तंत्रज्ञान आणले. ठिबक सिंचनाचे साहित्य स्वत: बनवायला सुरूवात केली. आपल्या भागातल्या गरजा व हवामान लक्षात घेऊन त्यांनी ठिबक सिंचनाचे तंत्रज्ञान विकसीत केले. त्यामुळे केळी पिकाचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढतच गेले. मग शेतकऱ्यांनी रेल्वेकडे स्पेशल डबे पुरवण्याची मागणी केली. 'बनाना कोचिंग स्टेशन रेल' अशी गाडी सुरू झाली. सुरूवातीला दिवसातून एक रेल्वे जायची. नंतर दोन गाड्या जाऊ लागल्या आणि पाकीस्तानशी आपले युद्ध सुरू झाले तेव्हा रोजच्या तीन गाड्या जाऊ लागल्या. रासायनिक खतांचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू झाल्यानंतर मात्र मालाची गुणवत्ता खराब झाली. सुरूवातीला ९६ तासात रेल्वे गाडी दिल्लीला पोहचायची. ती नंतर ६३ तासात, नंतर ४८ तासात पोहचू लागली. पठाणकोट एक्सप्रेस, अमृतसर एक्सप्रेस या गाड्यांना खास डबे जोडून केळी जाऊ लागली. त्याकाळी भाऊंनी खताची एजन्सी घेतली होती. आगपेटी एवढे खत प्रत्येक झाडाला द्या असे भाऊंनी सांगितले. त्यावेळी खत म्हणून अमोनियम सल्फेट व भुईमुगाची पेंड टाकायचे व नंतर टोळंबीची पेंड टाकायचे.



*केळीवरील करपा रोगासंबंधीचा प्रस्ताव तयार करण्यासाठी मोठ्या भाऊंच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत डी.के.महाजन, वसंतराव महाजन व डॉ. के.बी. पाटील*



सर्वप्रथम दुबईला निर्यात करण्यात आलेल्या केळी घडांची पाहणी करताना मोठेभाऊ, डी.के. महाजन, वसंतराव महाजन, डॉ.के.बी.पाटील

शेतकऱ्यांच्या हिताकरीता व त्याला उपयोगी पडेल असे सर्व व्यवसाय भाऊंनी स्वत: जाणीवपूर्वक सुरू केले. त्याकाळी त्यांनी ट्रॅक्टरची एजन्सी घेतली. शेतकरी सधन झाला होता. त्याला मालाची वाहतूक, शेतीची नांगरट व आंतरमशागत यासारखी कामे करण्यासाठी ट्रॅक्टर लागत होता. शेतकरी नावीन्याच्या मागे लागला होता. त्याची गरज भाऊंनी पूर्ण केली.

पूर्वी शेतकरी केळीचे कंद लावायचे. पण त्या कंदांमुळे अनंत अडचणी उभ्या राहायच्या. रोगराई यायची. यावरचा उपाय म्हणून मोठ्या भाऊंनी परदेशातून ग्रॅन्ड नैन ही केळीची जात आणली आणि टिश्यूकल्चर पद्धतीने रोपे तयार करून ती शेतकऱ्यांना पुरविली. आता जैन कंपनी दरवर्षी १२ ते १३ कोटी टिश्यूकल्चर केळी रोपांची निर्मिती करते आणि या रोपांना इतकी मागणी असते की, कंपनी ती ऑर्डर पूर्ण करू शकत नाहीये. टिश्यूकल्चर केळी रोपांच्या चाचण्या सुरूवातीला भाऊंनी श्री. डी.के. महाजन यांच्या शेतावर घेतल्या. कमी दिवसात खूप चांगले रिझल्ट लाभले. ग्रॅन्ड नैन केळीचा घड मोठा होता व वजनदार होता. पूर्वी आम्ही शेंदुर्णी, श्रीमंती, बसराई, अर्धापुरी या केळीच्या जाती लावायचो. पण त्यांच्यावर रोग यायला लागले. त्यामुळे त्या जाती लावणे बंद केले.

मोठ्या भाऊंनी पारोळ्याजवळ एका शेतकऱ्याच्या शेतात मायक्रो ट्यूबवर ग्रॅन्ड नैन केळी जातीची लागवड केली होती. ती पाहायला आम्हाला नेले होते. डोळ्यांनी आम्ही जेव्हा ते ३०-४० किलोचे घड ठिबकवर आलेले पाहिले होते तेंव्हा ठिबक, टिश्यूकल्चर, फर्टिगेशन यांचे महत्व आम्हांस कळाले. उपयुक्तता कळली. अनेक उद्योजक व व्यापारी शेतकऱ्यांशी व्यवहार करतात पण त्यामागे त्यांचा उद्देश नफा कमवून स्वत: मोठे होणे हा असतो. भाऊंनी तसा विचार कधीच केला नाही. शेतकरी मोठा व्हावा हाच त्यांचा आयुष्यभराचा ध्यास होता. त्यामुळे भाऊंची नाळ शेतकऱ्यांशी कायमच जुळलेली राहिली. शेतकऱ्यांची पिळवणूक होता कामा नये, आपण त्याच्यासाठी उतराई झाले पाहिजेअशी भूमिका त्यांनी सतत ठेवली. शेतकऱ्यांना कायम मदत केली. पाईप ७ ते ८ महिन्यांकरीता उधार द्यायचे. पण त्यावर व्याज कधी आकारले नाही. शेतकऱ्यासारखा प्रामाणिक माणूस दूसरा नाही. तो पैसे डूबवत नाही. वेळेवर आणून देतो यावर भाऊंची गाढ श्रद्धा होती. आयुष्यभर त्यांनी मेहनतीने व सचोटीने काम केले. त्यामुळे आमच्यासारखे शेतकरी पुढे चालून प्रगत झाले. आमचा प्रगतीचा पाया भवरलाल भाऊंनी घातला हे आग्रहपूर्वक व नम्रतेने प्रतिपादन करताना मला अतीव आनंद होतो आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त माझे विनम्र अभिवादन!

# ॥ भवरजी, तुम्ही निर्मिले पाणी ।।



मूर्त जाहली इथे विराणी
आज ही स्वप्नातली कहाणी
भगीरथाचा पुत्र होउनि
तुम्ही निर्मिले पाणी।।

उजाड डोंगर, खडकमाळ हा
जेव्हा पाहिला तुम्ही
हुरहुरले काळीज कराया
नंदनवन या स्थानी
स्वहस्ते वेचूनि दगड ते
अर्घ्य दिले घामानी
तुम्ही आणिले पाणी ।।

वृक्षांच्या रोमांचे हिरव्या
सजले डोंगर इथले
आम्र, सिताफळ, पोरुंनी
हा आसमंत डोले
ठायी ठायी वन दाट जाहले
मोर नाचती हर्षे
आनंदाने पक्षी गाती,
सुस्वर जीवनगाणी
कारण तुम्ही राखले पाणी ।।

तळ्या तळ्यांच्या बिलोरी आयनी
रुप पाही घनराई
अगा नवल हे कसे घडले?
चकित होती पशु गाई
मेघ थबकुनि जाती बरसुनि
मानवंदना देवोनि
तुम्ही अडविले पाणी ।।

बळीराजाच्या उध्दारास्तव
पाझर तुमच्या मनी
इथे सर्व साम्राज्य उभविले
कृषिस्तव ध्येयासाठी
रात्रदिन तो ध्यास जीवाला
त्यातून ही अमर कहाणी
तुम्ही निर्मिले पाणी ।।

सोन्याचे हे हात तुमचे
सोने केले दगड मातीचेही
पुरुषार्थाची गाथा आणि
कथा उज्ज्वल ध्येयाची
दृष्टी जोखते भविष्याला
वर्तमान तेजस्वी घडविला
या मातीच्या कणाकणावर
पत्थर आणि या काळावर
कर्तृत्वाची तुम्ही कोरली,
अमिट, मनोहर लेणी
तुम्ही जपून पाणी ।।

नकोत आत्ता ताज आम्हाला
नको नवी मंदिरे
हवीत अशी राष्ट्रासाठी
आधुनिक तीर्थक्षेत्रे
जैन हिल, व्हॅली, गुरुकुले
तुम्ही उभविली जनहिते
पाणी पाणी करणा-यांना
दिलेत पाऊस पाणी
भवरजी,तुम्ही निर्मिले पाणी ।।

**सौ.सुरेखा शहा, सोलापूर,** दि.९-७-२००३

Post Regn. No.: JAL/४१७/२०२५-२०२७
Published on १९th of every month, posted on २८th of every month at Jalgaon-४२५००१
RNI NO. MAHMAR/२०१८/७६९४४

**आदरणीय भवरलाल जैन यांच्या जयंतीनिमित्त कृषीमहोत्सव २०२४ प्रदर्शन भरविण्यात येत आहे**

# कृषी महोत्सव - 2024

## आग्रहाचे निमंत्रण

**आधुनिक हायटेक शेतीचे प्रात्यक्षिक पाहण्यासाठी आपण उत्सुक आहात का?**
**मग १४ डिसेंबर २०२४ ते १४ जानेवारी २०२५**
**या काळात आवर्जून जळगावच्या जैन हिल्सवर भरणाऱ्या कृषी महोत्सवाला भेट द्या**

शेतीच्या क्षेत्रातील अद्ययावत जागतिक तंत्रज्ञान विविध पिकांच्या माध्यमातून जैन इरिगेशन कंपनीने आपल्यासाठी जैन हिल्सवर उभे केले आहे. ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाधारित शेतीची कास धरली तरच चैतन्याचे व उत्पन्नाचे हे मोठे गाठोडे शेतकऱ्यांच्या हाती लागण्याची शक्यता आहे.

मग आपण या महोत्सवाला भेट देऊन "बघितले की विश्वास बसतो" या सिद्धांताचा अनुभव घ्यायलाच हवा!

शेती ही नफा मिळवून देणारी व फायद्याची होऊ शकते याचे साक्षात दर्शन या महोत्सवातून आपल्याला घडेल असा आम्हांला सार्थ विश्वास आहे.

**थेंब-थेंब पाणी जीवनात चैतन्य आणी**

**चला तर मग जैन हिल्सला जावू**
**नवनवीन पिकांच्या वाकुल्या डोळे भरून पाहू**
**आणि स्वतःच्या फायद्यासाठी लगेच कृतीत ही उतरवू.**
**यात हित आपलेच आहे.**

**आम्ही आपल्या स्वागतासाठी उत्सुक आहोत!**




या महोत्सवाला आपण भेट देणार असल्यास आपले नाव नोंदवा. येण्याची तारीख कळवा.
त्यासाठी खालील क्यू.आर. कोड स्कॅन करा.

**संपर्क :** गिरीश कुलकर्णी (९४०३८३३३९३)

कृषीतीर्थ मासिकाची डिजीटल आवृत्तीसाठी कोड स्कॅन करा